# माती जागवील त्याला मत

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य.
सं. क्र. २००८
स१७ १९९६८



REFBK-0016295
REFBK-0016295

२००
६४८४०
१५।३।६७.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्ध योजना
१९७०

एका मतदाराचा जाहीरनामा

# माती जागवील त्याला मत

ज्याला देश गहाण टाकायचा नाही
त्या सर्व पक्षीय व अपक्षीय
नेतृत्वासाठी !

REFBK-0016295
REFBK-0016295
१६२९५

चिंतन : बाबा आमटे

शिल्प : रमेश गुप्ता

साधना प्रकाशन
पुणे २

प्रथम प्रकाशन
८ फेब्रुवारी १९६७
प्रकाशक
प्रभाकर सिद्ध
साधना प्रकाशन
४३०-३१ शनवार
पुणे २
मुद्रक
वि. नी. पटवर्धन
साधना प्रेस
४३०-३१ शनवार
पुणे २
किंमत एक रुपया

या लेखनाचे कोणतेही हक्क
राखून ठेवण्यात आलेले नाहीत.
पूर्वसूचनेने यातील कोणताही व कितीही
भाग अचूकपणे उद्धृत करण्यास अनुमती मिळू शकेल.

राजकीय पक्ष व पुढारी अनेक हिकमती करीत असतात. जनतेला जनार्दन म्हणणे ही अशीच एक हिकमत आहे. काही थोडे अपवाद वगळले तर बहुतेक पुढाऱ्यांचा यावर विश्वास नसतो. सामान्य मतदाराला झुलविण्याचा तो एक डाव असतो, आणि आपल्या देशातील मतदारही या शाब्दिक पूजेवर संतुष्ट असतो. राजकीय पक्षांचा व पुढाऱ्यांचा धूर्तपणा त्याला समजत नाही असे नाही. पण तो बिचारा स्वतःच्या जीवनकलहात इतका गुरफटलेला असतो की, या दंभावर प्रहार करण्याइतकी त्याला फुरसत नसते. याचा परिणाम असा होतो की, राजकीय पक्षांना असे वाटू लागते की, शब्दांनी आपण या मतदाराला जिंकून टाकू. म्हणून निवडणुका आल्या की, आश्वासनांची खैरात करणारे लंबे-चौडे जाहीरनामे वेगवेगळे राजकीय पक्ष प्रसिद्ध करतात. या जाहीरनाम्यांत सद्यःस्थितीचे विश्लेषण केलेले असते, ही परिस्थिती आपण सुधारून दाखवू अशी दर्पोक्ती असते आणि 'स्व'ला केन्द्र कल्पून भविष्यकालाचे लोभसवाणे चित्र रेखाटलेले असते. हे जाहीरनामे फारसे कोणी वाचीत नाही, वाचले तरी कोणी त्याची गंभीरपणे दखल घेत नाही. प्रत्येक पक्षातील विचारवंत मात्र आपण देशाला अचूक मार्गदर्शन केले अशा भ्रमात स्वतःवर खूष असतात.

प्रस्तुत पुस्तकात बाबा आमटे यांनी हे जाहीरनामे फुंकरीसरशी उडवून दिले आहेत आणि परिस्थितीचे विश्लेषण करण्याचा आव आणणाऱ्या पक्षांच्या भूतकालातील अकर्तृत्वाचे भेदक चित्रण केले आहे. वेगवेगळ्या पक्षांच्या जाहीर-नाम्यातील 'शब्द बापुडे पोकळ वारा' आहेत असे सांगून आमटे म्हणतात की, या देशातील कोट्यवधी लोकांची भूक ही आंतर भारती भाषा आहे आणि या भाषेतील शब्द जोपर्यंत उमटत नाहीत तोपर्यंत पक्षांचे जाहीरनामे फोल आहेत. मतांवर प्रेम करणाऱ्या पक्षांना, त्यांच्या नेत्यांना आणि कार्यकर्त्यांना आमटे यांनी मातीवर धुंद प्रेम करण्याची कळकळीची विनंती केली आहे. एका मतदाराचा हा जाहीरनामा अनेकांना खुपेल, काहींना रुचेल, अनेकांना हा उद्धटपणा वाटेल तर कोणाला हे खडे तात्त्विक बोल आहेत असा प्रत्यय येईल. एक मात्र निश्चित की मतदाराचा हा जाहीरनामा लिहिणाऱ्या या विलक्षण माणसाला कोणी निंदा, कोणी वंदा, त्याचा स्वदेश–हिताचा धंदा चालूच राहणार !

# अनुक्रम


प्रस्तावना ३

मी एक मतदार ५

अंतिम लढ्याचे पडघम १०

वर्तमानाच्या शिल्पकारांनो !

माझ्या कर्णधारांनो !! १७

'ट्रोजन'चे लाकडी घोडे २४

काही विदूषक, काही जिवाणू २९

वटवाघळे ३५

पंख तुटके प्रकाश–पक्षी ४४

म्हातारा फिनिक्स ५०

रेतीचे बांध ५५

माती जागवील त्याला मत ६१

एक आघाडी : समान्तर कार्यक्रम ६७

## १

## मी एक मतदार

१६२०५

क्षितिजाच्या उंबरठ्यावरील रक्तलांच्छित स्वातंत्र्य !
–त्यावेळी तो थकलेला, खचलेला
आणि अनुयायांच्या गराड्यात एकाकी असा होता !
आधी माझ्या देहाचे व मग देशाचे तुकडे पडतील
असे तो म्हणाला
पण आधी देशाचे तुकडे पडले
आणि त्यावरून त्याचे प्रेत गेले !
उद्ध्वस्त अवशेषांच्या नगरीतून
लक्षावधींची ती शवयात्रा सरकत होती
तेव्हा मीही तिच्यात होतो.

तेव्हा तो तरुण होता
व स्वातंत्र्ययुद्धातील बंदिवान होता
'मी पंतप्रधान झालो
तर काळा–बाजारवाल्यांना
आधी भर चौकात फासावर चढवीन'
असे तो म्हणाला.
तेव्हा त्याच्या तेजस्वी रार्जाबंडया मूर्तीकडे

त्याच्या मित्रांनी व भक्तांनी अभिमानाने पाहिले
त्यांत मी होतो.
पण स्वातंत्र्यानंतर तो पंतप्रधान झाला
आणि समुद्रकिनाऱ्यावरील वाळूच्या मैदानात
लक्षावधींच्या गर्दीपुढे तो आवेशात उद्‌गारला, की–
'काळा–बाजारवाल्यांना फासावर लटकवले पाहिजे ! '
तेव्हा गर्दीतले काळा–बाजारवाले
हास्याचा मंद-मग्रूर खणखणाट करीत म्हणाले :
" दोस्ता,
आम्हाला फासावर लटकावले पाहिजे
हे कबूल
पण तो फासाचा दोर तू आणणार आहेस कोठून ?
तोही तुला काळ्या बाजारातच खरेदी करावा लागेल ! "
तो मग्रूर खणखणाट ऐकणाऱ्या
हतबुद्ध आणि लाचार सामान्यांच्या गर्दीत
मीही होतो.

पूर्व आणि पश्चिम संस्कृतीच्या दोन टोकांवर
त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे विश्वमोहक इंद्रधनुष्य
उभे असलेले मी पाहिले
पण त्या कमनीय कमानीखाली
एक विराट आणि विषण्ण पोकळी होती
लाचारीच्या कबरीत कर्तृत्व बंदिस्त होऊन पडले होते.
जनता आणि जननेता
यात गूढधूसर अंधाराने आपला अंतर्पट विणला होता.
एक एक मूल्य इतिहासजमा होत होते
आणि हिमालयाची ऐतिहासिक उंची
वर्तमानाच्या एकाच धक्क्याने
गडगडून पडली होती

त्या धक्क्याने ते चिरतरुण चैतन्यशिल्पही
भंगून पडले होते !

समुद्राच्या आयुष्यात जशी ओहोटी
तसे राष्ट्राच्या आयुष्यात असे क्षीण क्षण येतात
पण ओहोटीने काही समुद्र सरत नाही
आणि ज्याने शतकांचे पराभव पचवले आहेत
ते राष्ट्र क्षणांच्या आघातांनी मरत नाही

त्याच ओहोटीच्या पोटात
भरतीची गर्जिते काळाने ऐकिली
पुनश्च एक महाभारत
घडत असलेले त्याने पाहिले
या महाभारतात पांडव आहेत
आणि कौरवही आहेत
पण ते एकशे पाच होऊन लढू शकतात
हे त्याला दिसले
शत्रूंचे संपूर्ण आडाखे उधळून लावीत
हा अजस्त्र विविधतांचा देश
एक झाला
पराभवात व मग विजयातही.

महासागरातल्या प्रचंड हिमनगाचे नऊ अंश
पाण्याखाली असावे
तशी ही एकात्मता आणि हे धैर्य होते.
आणि ज्याची शारीरिक उंचीही
भारतीय सरासरीहून कमी होती,
असामान्यतेचे कुठलेही वलय
ज्याच्या भोवती नव्हते–त्याने

हा जगातल्या सर्वात मोठ्या लोकशाहीचा गोवर्धन
लीलया पेलून धरला.

तेव्हा प्रत्येक भारतीय मन
आपल्यातल्या अव्यक्त शक्तीने थरारले,
उंचावले.
तो थरारा भोगणाऱ्या कोटचवधींच्या
भाग्यवान समूहातील
मीही एक !
मी एक मतदार आहे
गणतंत्राचे प्राचीन प्रयोग राबवून
जनतंत्रापर्यंत येऊन पोचलेल्या
मानववंशाच्या सर्वात मोठ्या परंपरेचा
वारसदार आहे !

प्राचीन भारतीय गणतंत्रावर
हे पाश्चात्य जनतंत्राचे कलम बांधण्यात आले आहे
मूळ शाखा जिवंत आणि जातिवंत आहे
तिच्या नसानसांतून चिवट जीवनरस वाहतो आहे
जेथे पंचायतीतला हुक्का पिणारा
गरिबातला गरीब माणूस
गावाचा कारभार पहात आला आहे.
शाही लोकांना गावाच्या शिवेवरच
थोपवून ठेवण्यात त्याने यश मिळवले होते.
हा माणूस अडाणी आहे
अशी बोलवा आहे
परंतु त्याच्या सामूहिक निर्णयांनी या लोकशाहीला
खवळलेल्या सागरातील एखाद्या उंच, अभेद्य बेटासारखे
स्थैर्य दिले आहे.

आणि तिच्या प्रगतीची प्रक्रिया
चीड आणण्याइतकी धीमी असली
तरी तिच्या अभिजात शहाणपणावर
पुन्हा एकदा काळाचे शिक्कामोर्तब होत आहे–
अठरा वर्षांत तिने राष्ट्रपित्याचा खून,
निर्वासितांचे लोंढे
वंश, भाषांचे लढे
दुर्भिक्ष्ये व टोळधाडी पाहिल्या.

अठरा महिन्यांच्या आत
दोन नेत्यांचा विरह साहिला
आणि तरी तिचे मन मजबूत
व डोके ताळ्यावर राहिले आहे.
लोकशाहीचे हे महाशिल्प घडवणारा
शंभर कोट हातांचा
मी शिल्पकार आहे.

मानवी गुलामीच्या वादळी गराड्यात
स्वातंत्र्याचा काफला पुढे हाकारणारा
एकाकी व लहान
पण एकत्र आणि महान
असा कर्णधार आहे
मी एक मतदार आहे!

२

## अंतिम लढ्याचे पडघम्

हुकूमशाही आणि लोकशाही
यांतले निकराचे अंतिम युद्ध
या देशाच्या सीमेवर
आणि सीमेच्या आतही लढले जाणार आहे.
हुकूमशाही विरुद्ध लोकशाही
म्हणजे व्यक्तीच्या अहंकाराविरुद्ध
समष्टीच्या जीवनसत्यांचा लढा.
अतृप्त, स्फोटक मनांचे झुंडतंत्र
म्हणजे हुकूमशाही.
तृप्त, तुष्ट मनांची विविधरंगी एकात्मता
म्हणजे लोकशाही
हुकूमशाहीत कारस्थाने राज्यपद्धती ठरवीत असतात
आणि कारस्थानांचे नाते क्रौर्याशी असते,
शौर्याशी नसते.
लोकशाहीत नेत्याचे सिंहासन
प्रजेच्या हृदयस्थानावर उभारलेले असते
लोकशाहीचे नाते प्रीतीशी असते,
भीतीशी नसते.

हुकूमशहा हा बलात्काराचे अपत्य असतो
लोकनेता हा जनतेचा ध्येयपुत्र असतो
लोकशाहीतली मतपेटी ही जनतेची हृदयमंजूषा असते
तर हुकूमशाहीचा लढाऊ घोडा
स्वातंत्र्याची शवपेटिका वाहात असतो
तो आपल्या टाचेखाली इतरांचे
व मग स्वत:चेही थडगे उकरीत असतो.
सर्कशीच्या रिंगणातले हिंस्रपशु
चाबुकधाऱ्याला जो आदर दाखवतात
तसा आदर त्याला मिळतो.

हुकूमशाहीत प्रत्येकाला
अंधारात रोखलेले शस्त्र
एकाकी क्षणात भिववीत असते
आणि मग ज्याच्यावर प्रीतिपुष्पांचा दुतर्फा वर्षाव होतो
त्याचाच मुडदा कबरीतून उखडला जातो
कालची दैवते आज देशद्रोही ठरतात
हुकूमशहाची दृष्टी खलबतखान्यात बंद असते
लोकनेत्याचे डोळे क्षितिज भेदून जाणारे असावे लागतात.
एका पिढीपूर्वी जगाने पाहिलेली
हिटलर-मुसोलिनीची जोडगोळीच
माओ, अय्यूबचे नवे मुखवटे घालून
पुन्हा जगाच्या रंगमंचावर अवतरली आहे
पाकी जनतेचे मन चीनच्या रणगाड्यांनी
केव्हाच काबीज केले आहे
आणि हुकूमशाही अश्वाच्या टापांखाली
लोकशाहीचे अर्भक तेथे केव्हाच चिरडले गेले आहे
आणि हुकूमशाहीचा हा चढाईखोर घोडा
थरपार्करच्या वाळवंटातून आज भरधाव उधळत असला

तरी केव्हातरी तो थकणार आहे
आणि त्यावेळी त्याच्या पाठीशी असलेला ड्रॅगन
त्याला गट्ट करणार आहे.
आणि लोकशाहीची इज्जत वाढवण्यासाठी
जणू नियती एक नाटच
जगाच्या रंगमंचावर घडवून आणत आहे
युद्धाच्या खाईकडे हुकूमशाही रणगाड्यांच्या वेगाने
जग भरधाव आगेकूच करीत असता
एका स्त्रीच्या हातात सत्ता देऊन
लोकशाहीच्या इतिहासातले सर्वांत मोठे साहस
या देशाने केलेले आहे !
पण या साहसाची कदर
लोकशाहीच्या पूर्व दैवतांनी अजून केलेली नाही
भारतमातेचे हे रूप
प्रसूतिवेदनेने हातपाय झाडणाऱ्या
गरीब आईसारखे आहे
तिच्या पोटी लोकशाहीचे अर्भक
प्राणांतिक वेदनेतून जन्माला आलेले आहे
लोकशाहीच्या त्या मोठ्या आयांनी
या अपत्याचे अपरंपार दायित्व करायला हवे होते
पण हे अपत्य म्हणजे जणू वाळीत टाकलेले
अनाथ अर्भक ठरले आहे
आणि या थोरल्या आया पूतनामावशीसारखी
भूमिका वठवीत आहेत.
त्यांच्या खऱ्या प्रेमाचा पान्हा
या अर्भकाला मिळायला हवा होता
या पाश्चात्य लोकशाह्यांचे विशुद्ध दूध
त्याला बाळसे येण्यासाठी आवश्यक होते
पण त्यांच्याकडून त्याला मिळत आहे

केवळ डब्यातले, पावडरीचे
सत्त्वशून्य, मचूळ दूध !
लोकशाहीचे हे वत्स जातिवंत ( पेडिग्री ) आहे
नवस्वतंत्र मानववंशांना
लोकशाहीचे पयोष्ण पाजणारी
ही कामधेनू ठरणार आहे.
अजून अंधारातून सूर्योदयाकडे
वाटचाल करीत असलेल्या
मागासलेल्या पूर्व गोलार्धातील
रंगीत राष्ट्रांच्या आशा–आकांक्षांचा दीपस्तंभ
या द्वीपकल्पावरच खडा राहणार आहे
कारण अमेरिकेची स्वातंत्र्यदेवता
लोकशाहीची रखवालदार म्हणवीत असली
तरी खुद्द तेथे शाही लोकांची लोकशाहीच आहे
तेथे करोडपतीच अध्यक्षपदाची निवडणूक
लढवू शकतो.
सामान्य माणसांचे राज्य पाहण्याचा
प्रसंग आला
तरी या उदयोन्मुख लोकशक्तींना
भारतातच यावे लागेल
आणि म्हणूनच
भारतही उद्याच्या लोकशाह्यांची
काशी, रोम व मक्का ठरणार आहे.
पण जगातल्या या सर्वांत मोठ्या लोकशाहीचे मूल्य
जगातल्या प्रतिष्ठित लोकशाह्यांना आकळलेले नाही
ज्या पारड्यात ती जाईल
ते जगाला पेलणार नाही इतके जड होईल
हा इतिहासाचा संकेत
रुज पेंट जपणाऱ्या या पाश्चात्य बायांनी

ओळखलेला नाही.
लोकशाहीची ही नवजात कामधेनू
त्या मांसाकरताच वाढवू इच्छितात !
तिचे संजीवक पयोष्ण पाहिजे
की लाल मांस ?
हा सवाल काळाने त्यांच्यापुढे
टाकला आहे.
त्यांच्या प्रौढत्वाहूनही तिचे बाल्य
अधिक परिपक्व असल्याची खूण
सामान्यातील सामान्य माणसाच्या
आणि मग एका मुलीच्या हातात
आपले सर्वोच्च सत्ताकेंद्र सोपवून
तिने पटवून दिली आहे.
"भांडवलशाहीच्या तुमच्या कुरणात
वारेमाप चरू द्या"
असे ही कामधेनू म्हणत नाही.
पामीरच्या पठारावर चरण्याचीही
तिला फारशी हाव नाही
पण ती नुसत्या उच्छिष्ट गवतांच्या काड्यावर
जगणार नाही
आणि अपमानकारक अटींच्या पोत्यातला
औदार्याचा भुसा
तिला फार काळ लाचारीच्या कह्यात
बंदिस्त ठेवू शकणार नाही.
आणि आपले संपूर्ण अंदाजपत्रक ओतूनही
युद्धसिद्धतेच्या स्पर्धेत
हा देश विजयी होऊ शकणार नाही
परंतु सिद्धान्तांच्या युद्धात
एकटा पडलेला दिसत असला

तरी तो विजयीच होत चालला आहे.
चित्रातल्या या उज्ज्वल रंगरेखा आहेत
अदम्य आशावादाच्या कुंचल्याने चितारलेल्या
तथापी कभिन्न, भेसूर व उजाड रंगही आहेत
नव्या पाणलोटांनी जागे होणाऱ्या अवरुद्ध जलाशयासारखे
गढूळ व विद्रूपही !
या चित्रात एक रिकेटी, थोराड पोटाचे अर्भक आहे
आयुष्यातले चौथे पाऊल टाकताना
त्याचे सर्वच्या सर्व शंभर कोट हात
भिकेसाठी पसरलेले दिसत आहेत !
शस्त्रास्त्रांची व यंत्रतंत्रांची भीक तर ते मागतेच आहे
पण अन्नाचीही भीक
ते वाढत्या उत्साहाने मागते आहे ! !
स्वातंत्र्य मिळाले तेव्हा या योजना नव्हत्या
हे मोठमोठे प्रकल्प नव्हते
आणि तरी अधूनमधून आम्ही
धान्य बाहेर पाठवीत होतो !
त्यानंतर या नवजात अर्भकाची भूक वाढत गेली
पण त्याची काम करण्याची ताकद कमी पडत गेली
कारण स्वातंत्र्ययोद्ध्यांची ताकद
सत्तायुद्धात खर्ची पडू लागली
आणि सर्व भारतीय नेतृत्व
आपापली गुढी उभारून
आणि आपापले पंथ उद्घोषित करून
दिल्लीकडे तोंड वळवून निघाले !
योजनेची पाने कर्तृत्वाच्या बाबतीत कोरीच राहिली आहेत
आणि भारताच्या गंगाजळीप्रमाणे
शेती हा जो भारताचा अक्षय जीवनकोष
त्यालाही गळती लागली आहे !

वातावरण शिळे, शिणलेले आहे
राष्ट्र थकलेले व बावरलेले आहे
पक्षांना पक्षघात झालेला आहे
मतांची फक्त मतलबाशी गाठ पडली आहे
निवडणूक ही फक्त आश्वासनांची टाकसाळ झाली आहे
नोटांसारखा आश्वासनांचाही चलन–फुगवटा
या देशात झाला आहे
आणि सर्व श्रद्धांचे अवमूल्यन होऊन चुकले आहे !
सीमांच्या पल्याड एका निकराच्या लढ्याचे
पडघम झडत आहेत
पण सीमांच्या आत
सारे सुन्न आणि सामसूम आहे !

## ३

## वर्तमानाच्या
## शिल्पकारांनो !
## माझ्या कर्णधारांनो ! !

जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीच्या
शिल्पकारांनो व कर्णधारांनो,
माझ्या पक्षोपपक्षांतील नेत्यांनो व कार्यकर्त्यांनो
तुमच्याबद्दल मला आपुलकी व आदर आहे
दैनंदिन व्यक्तिगत विवंचनेतून डोके वर काढून
इतरांच्या व उच्चतराच्या विचारांनी
कृतिप्रेरित झालेले तुमचे उत्साहगसमूह
हे या देशाचेच नव्हे
तर जागतिक लोकशक्तीचे आशास्थान आहे.
पक्षोपपक्षांबद्दल तुच्छतेने बोलण्याची
आंबलेल्या अकर्मण्यांची
व वैफल्यग्रस्त दांभिकांची
एक जमात, एक पद्धत आणि एक फॅशन आहे
ती मला अभिप्रेत नाही
पक्षीय राजनीतीचे मानसशास्त्र
आतून व बाहेरून मी अनुभवले आहे
अभ्यासले आहे
आणि आपल्या अनुभूतीच्या व अभ्यासाच्या

निष्कर्षाचा फायदा
समाजहितासाठी उपलब्ध करून देणे–
टु काँट्रिब्यूट वन्स इन्स्ट्रक्टेड जजमेंट
टोवर्डस कॉमन गूड
–ही लोकशाहीतल्या नागरिकत्वाची
व्याख्या मानली गेली आहे
नागरिकाला तो हक्क आहे
त्याचे ते कर्तव्य आहे
आणि सगळे पक्ष जेव्हा सांगतात
की आम्ही देशाच्या सुरक्षेचे
व भवितव्याचे पहारेकरी आहोत
तेव्हा या पहारेकऱ्यांवरही पहारा ठेवणारे
लोकशाहीत हवे असतात.

लोकशाहीतला नागरिक जागरूक पाहिजे
कारण तोच मतांचे दाणे टाकून
या पक्षांचे पोषण करीत असतो.
लोकशाहीत अशा प्रयोगशील तत्त्वचिंतकांचा वर्ग
वाढायला हवा असतो
जे फक्त वादळ येणार म्हणून भयानक भाकिते
वर्तवणार नाहीत
तर वादळातून नौका सुखरूप कशी न्यावी
याचा विचार–आणि आचारही देतील.
सत्तास्थानांपासून दूर राहूनही
जे सत्तेच्या उपयोगाला दिशा देऊ शकतील
समाजपुरुषाच्या नाडीचा प्रत्येक ठोका ऐकून
जे त्याच्या रोगांचे यथार्थ निदान करू शकतील
आणि जीवनसत्त्वांचे नवेनवे प्रवाह
त्याच्या मज्जाकेंद्रांत टोचीत राहतील

निवडणूक म्हणजे लोकशाहीचे स्वयंवर
यावेळी भुकेच्या यक्षप्रश्नाचे पुरातन शिवधनुष्य
पणास ठेवलेले आहे !
हे शिवधनुष्य उचलून लीलया तोडणारा राम
हा कोणत्याही छोट्या पक्षाचा असू शकेल
वनवासात गेलेलाही एखादा पक्ष
हा पराक्रम करून दाखवू शकेल.
पण रामराज्याच्या निर्मितीसाठी
राज्याकडे पाठ फिरवून जंगलात जाऊन बसू शकणारे
आणि पाषाणात सुप्त, अभिशप्त पडलेल्या
अहल्यांचा उद्धार करणारे राम
अखंड सेवायज्ञ आचरणारे लक्ष्मण
आणि ठेव म्हणून राज्यपद सांभाळणारे भरत
अशा त्रिविध शक्तींची आवश्यकता असते.
कोणत्या पक्षात या शक्ती उत्पन्न होतील ?
आणि लोकशाहीत उद्या कोणता पक्ष गादीवर येईल ?
याचे गणित मांडता येत नाही
धैर्य, उत्साह आणि दर्शन असलेले अल्पसंख्य
हेच केव्हातरी बहुसंख्य होतात.
हे लोकशाहीतले गृहीत कृत्य आहे.
या अल्पसंख्य पक्षांनीही त्या दिशेने
आतापासूनच आपली उभारणी करावी
ही माझी कळकळ आहे.
कारण वैफल्याचे एक फार मोठे सावट
त्यांच्यावर दाटून आलेले मला दिसत आहे

अज्ञान व दारिद्र्य यांविरुद्ध लढण्याचा उद्‌घोष
प्रत्येक निवडणुकीत, प्रत्येक पक्षाचा जाहीरनामा
करीत आला आहे

आणि आता त्याला हास्यास्पद वल्गनांचे रूप
प्राप्त झाले आहे
दैनंदिन वास्तवाचे चटके
दिवसेंदिवस प्रखर होत आहेत
आणि नुसत्या शब्दांची ही झड
निकामी ठरू लागली आहे
मोठे प्रश्न हाताळायची कुवत नसली
म्हणजे छोटचा प्रश्नाद्वारे रणे माजवून
निवडणुकीचा तवा तापवण्याची पाळी येते
आणि वैफल्याची पोकळी आत असली
की बाह्य आवाजीने ती झाकण्याचा प्रयत्न होतो
विरोधकांच्या व्यासपीठांवरील
श्रवणीय व रोमांचकारी भाषणांतही
उपरोध हाच मुख्य मालमसाला असतो
उपरोध म्हणजे अभावात्म सत्य ( निगेटिव्ह ट्रूथ )
ते भाषण ऐकताना मला फार बरे वाटते
पण उद्या तुम्हाला या जागी ठेवले
तरी तुम्ही दुसरे काय करणार ?
असा प्रश्न माझ्या भारावलेल्या मनात डोकावतो
आणि मग तुमची एकमेकांतली भांडणे
– ( डावे अधिक डाव्यांशी, उजवे अधिक उजव्यांशी
व सगळे एकमेकांशी )–
तुमचीही अधःपतने
हेवेदावे व क्षुद्रता यांच्या चिखलात लडबडलेले
तुमचेही पाय दिसतात !
आणि तुम्ही व आम्ही
यांतला अंधाराचा अंतर्पट अधिक दाट होतो
तुमचे वाद व तुमचे कार्यक्रम
सर्व अवरुद्ध झालेले आहेत

त्यात येणारे व त्यातून बाहेर पडणारे
नवे जीवनदायी स्रोत
( रिफिलिंग अँड आउटलेट )
दिसत नाहीत
जनमनाच्या अंतर्गाभ्यातले कोंब
नुसत्या शब्दवर्षेने फुलण्याचे दिवस मागे पडले !
निवडणुकीचे भोंगे ऐकून ऐकून
त्यांचे कान किटून गेले आहेत
कोठेतरी टाकायचे म्हणून आम्ही मत टाकतो
आणि कुणावर तरी राग काढायचा म्हणून
तुम्ही बोलत सुटता !
काहीतरी केले म्हणजे काहीतरी होईल
म्हणून आपल्या शक्ती वैराणात वेचीत असता
सीमेवरील शत्रूंशी लढताना आपण एक होतो
पण भूक आणि अज्ञान हेही आपले सामान्य शत्रू
त्यांच्याशी लढताना हाजीपीरची जिद्द
आपण दाखवीत नाही
तेथे आम्ही तेजपूरसारखी आघाडी लढवतो !
अपंग माणसाचे कर्तृत्व

अशिक्षित, थोडे विकृतच असे मन
आणि निकृष्ट, निर्जल जमीन
ही शेतीच्या कक्षेत, स्फूर्तयत्नांच्या बळावर
कोणता पराक्रम करू शकतात
ते मी पाहिले आहे
आनंदवनाच्या श्रमनगरीत
पाचशे रुग्णांचा सहस्रकर समूह
समृद्धीचा गोवर्धन उचलू शकला
तसा तो खेड्याखेड्यात कसा उचलला जाईल

९६२०५

या प्रश्नाच्या प्रदीर्घ चिंतनातून
उत्स्फूर्त झालेले एक समाधान
मी तुमच्यापुढे मांडीत आहे
अपंगत्वावर विजय मिळवलेल्या मनांचा
मी अभ्यास केला
जीवनाची एक छोटीशी प्रयोगशाळा उभारून
या यक्ष प्रश्नाचे उत्तर शोधून काढण्याचा प्रयत्न केला
प्राप्त परिस्थितीशी
प्राप्त साधने,
चिंतन व कृती यांच्यासह टक्कर दिली
मानवी समुहांच्या निरनिराळ्या थरांत
समरस झालो
त्या मनांची भूक व त्या शरीरांची भूक
त्यांच्यात राहून अनुभवली
म्हणून हे धाडस करतो आहे
उपदेशकाचा आव आणीत नाही
प्रयोगशाळा लहानशीच असते
पण तिच्यात लागणाऱ्या शोधांचे परिणाम
मोठे असतात !
वटवाघळांच्या डोळ्यांचा अभ्यास करून
वैज्ञानिक रडारची भेदक नजर शोधून काढतो
तशी समाजसेवेच्या प्रयोगशाळेत
शोधून काढलेली ही दृष्टी आणि हा कार्यक्रम आहे
महारोगी भीक मागत होता
त्यात जे नव्हते, त्याऐवजी त्यात जे होते
त्याकडे दृष्टी केंद्रित करून
त्यात कामाची सवय रुजवावी लागली
राष्ट्रही आज भीक मागत आहे
त्याच्यातही कामाची सवय बाणवावी लागेल

प्रत्येक हाताला काम देण्याचा
व कामाची सवय बाणवण्याचा कार्यक्रम
कोणत्या पक्षाने अंगीकारलेला
व अमलात आणलेला मला माहीत नाही !
स्वप्नरंजन नव्हे, एक सिद्ध सत्य,
आणि केवळ उत्तर नव्हे
तर ते मिळवण्याची एक रीतही
सर्व भारतीय कर्तृत्वापुढे
मी मांडीत आहे.
सर्व भारतीय पक्षनेतृत्वास,
पक्षघात झालेल्या पक्षातील तडफडत्या रक्तास
हे आवाहन आहे !
व्याधिग्रस्त समाजपुरुषाच्या मज्जाकेंद्रांत
जीवनसत्त्वांचा नवा प्रवाह
टोचण्याचा हा प्रयत्न आहे !

## ४

## ‘ट्रोजन’चे लाकडी घोडे !

‘जनसंघ’ हा भारतीय राजकारणातील
एक मोठा ‘ट्रोजन हॉर्स’ आहे !
‘स्वतंत्र’ हा दुसरा ! !
या लोकशाहीतल्या लाकडी घोड्यांच्या पोटांत
मध्ययुगीन सरंजामदारांची
व संस्कृतीच्या तथाकथित मिरासदारांची
सेना दडलेली आहे !
एका ‘चक्रवर्ती राजा’भोवती गोळा झालेल्या
राजेरजवाड्यांचा
आणि स्वतःचे कोणतेच तंत्र नसलेला
हा ‘स्वतंत्र’ पक्ष आहे !
हुजूरीच्या ढासळणाऱ्या बुरुजावर उभे राहून
ज्यांनी मतस्वातंत्र्य नाकारले होते
तेच आता आपल्या भरजरी झोळ्या पसरून
स्वातंत्र्यासाठी मत मागत आहेत
हा इतिहासाने केलेला उपरोध
आणि काळाने घेतलेला सूड आहे !
आणि संस्कृतीचे घटपट पाठ असलेल्या

अवतारी महंतांचा
बौद्धिकांचे डोस प्यालेला तो घोडा !
सांघिक कवायत व दसऱ्याचे शस्त्रपूजन
यांनी आपल्याभोवती गर्दी जमवील
पण त्या गर्दीला
रामरामी आणि ध्वजप्रणाम
यापलीकडे तो काही देऊ शकणार नाही.

गतीच्या युगात ही अगतिक वाहने टिकणार नाहीत.
जगन्नाथाचा महारथ त्यांना ओढता येणार नाही
केसरी उपरणे व भगवा फेटा
अणुयुगात फडफडणार नाही
जेटच्या गतीत त्यांच्या चिंध्या होतील.
पुराणातील वांग्यांचे भरीत
भुकेल्या पोटांच्या कामी पडत नाही.
आणि गर्दी जमवणारा
सांस्कृतिक कार्यक्रमाचा डमरू
फार काळ ती थोपवून ठेवू शकत नाही
या कार्यक्रमांनी मनोरंजन होते
जीवन-मरणाचे प्रश्न सुटत नाहीत

आर्थिक कार्यक्रम हाती घेण्यात
त्यांचा स्वार्थ आड येतो
धरले तर चावते
आणि सोडले तर पळते
आणि मग या दुभंगलेल्यांच्या वंचनेतून
दंभाचा जन्म होतो !
भाकड गाईंना वाचवण्यासाठी
प्राणांतिक उपोषणे होतात

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

व देशव्यापी आंदोलनाची धमकी दिली जाते
आणि उपासमारीच्या निषेधार्थ
पाळीपाळीचे चक्री उपोषण सुरू होते !

सैनिकांना सरबत पाजून
आणि चार कांबळी गोळा करून
युद्धप्रयत्नांची इरेसरी मिरवता येते
पण मग त्यांचा मोबदला म्हणून
कैकेयीसारखा असा वर मागायचा असतो
ज्याने दरिद्रीनारायणाला परत वनवासात पाठवता येईल !
या शब्दांचा व कृतींचा रंग भगवा असला
तरी विचारांचा व प्रेरणांचा रंग कृष्ण आहे
त्यांना सांघिक मन कळते,
व्यक्तीचे कळत नाही
कारण सामान्यांचे मन जाणण्यासाठी
एक सामान्य माणसाची बैठक
–कॉमन मॅन्स पेब्युलम–
हवी असते
ती त्यांच्याजवळ नाही.
त्यामुळे शाही लोकांचीच लोकशाही
ते उभी करतील !

आणि त्यांचे अश्मीभूत पुरातन आदर्श
वस्तुसंग्रहालयाच्या उपयोगाचे
पण जीवनाला अनुपयुक्त आहेत.
ऐतिहासिक अहंकारांची गाडलेली हाडे उकरून
इतिहास जागा ठेवता येत नाही.
वर्तमानाची आव्हाने स्वीकारल्यानंतरच
नवा इतिहास घडत असतो

भूक हे भारतीय वर्तमानाचे खडे आव्हान आहे
आणि भारताचा इतिहास
त्याचे उत्तर देऊ शकत नाही !

जे हे आव्हान ऐकतील व स्वीकारतील
त्यांच्या नावाने उद्याचा इतिहास लिहिला जाईल
हे आव्हान पेलू शकेल अशी
निष्ठावान, शिस्तबद्ध, अनुयायांची,
मन आणि मेंदू
संघाच्या हजारो शाखांवर
प्रशिक्षित झालेली सेना
तुमच्या जवळ आहे
आणि भारतीय वर्तमानातील
सर्व राजकीय व सांस्कृतिक वाद
हे आर्थिक वैषम्यातून उत्पन्न झाले आहेत
हे ओळखून
अर्थिक कार्यक्रमावर भर देऊन
तुम्ही पक्ष उभा केला तर
या पणतीला फार मोठे भवितव्य आहे
अन्यथा ते अंधःकारमय आहे !

आंबलेल्या कढीला पुनःपुन्हा
ऊत आणता येणार नाही
आणि शहरात युगांतर हायस्कुले चालवून
युगांतर होणार नाही
आणि मग एक असा विचित्र दिवस उजाडेल
जेव्हा संघ–जनसंघात उरलेला व शिरलेला
खालचा वर्ग
कम्युनिस्ट होईल !

भगव्याचा लाल रंग व्हायला
वेळ लागणार नाही
कारण–एका नेत्याच्या मागे जाणारे
त्याचे मन आहे
आणि झापड बांधून चालण्याची
त्याला सवय आहे !

५

## काही विदूषक,
## काही जिवाणू !

भारताची फाळणी हा गुन्हा नव्हता
कारण जाणून बुजून तो कोणी केला नाही
मात्र ती एक युद्धशास्त्रीय चूक
–स्ट्रॅटॅजिकल एरर– होती.
जो आणखी एक लढा द्यावा लागला असता
तो देण्याची हिंमत
भारतीय कर्णधारांनी दाखवली नाही.
स्वातंत्र्य आणखी थोडे लांबणीवर पडले असते
आणि सत्तास्थाने आणखी थोडी दुरावली असती
पण ‘प्रत्यक्ष कारवाई’ला तोंड देण्याची
धमक आणि धडक
नेत्यांच्या त्या समूहाने दाखवली असती
तर एका विषारी प्रश्नसर्पाचे डोके
तेव्हाच ठेचले गेले असते
उदात्त हेतूंनी एक अनुदात्त निर्णय
घेण्यात आला !

त्यामुळे भारतीय अल्पसंख्यांची समस्या

सुटली तर नाहीच
पण हिमालयाच्या आत शत्रू
आणि देशभर संशयाचे कुबट धुके उत्पन्न झाले.
प्रगतीच्या पायात
एक दुहेरी साखळदंड अडकवण्यात आला.
झाले ते होऊन चुकले आहे
परिस्थितीच्या हातात हात घालूनच
तिला वळणावर न्यावे लागणार आहे
आणि नुसत्या प्रतिक्रियेने
परिस्थिती हाताळता येत नाही
उलट ती हाताबाहेर जाण्याचा संभव असतो.
हिंदुसभा ही नुसती एक प्रतिक्रिया आहे
आणि प्रतिक्रिया नेहमी अभावाच्या पोकळीत
विरून जात असते
म्हणून हिंदूंची संख्या दिवसा दुप्पट वाढत असली
तरी हिंदुसभा मात्र दिवसेंदिवस रोडावत आहे
एक विदुषकी थाटाचा जुनाट सीन
या पक्षाने उभा केला आहे
कंबरा लागलेल्या हरदासी तट्टावर बसून
शिवाजी महाराजांच्या आवेशाने
ही हिंदुसभा रणगर्जना करते
अथवा गोमूत्र शिंपून
समृद्धी निर्माण करण्याची भाषा
एखादी रामराज्य परिषद बोलत सुटते !

आणि धर्मांधतेचा चांद शिरावर मिरवीत
मुस्लिम लीग आजही दिमाखाने वावरत आहे
कारण निवणुकीची कामधुंद चढली
की लोहिया, कामराजांसारखे ब्रह्मचारी

या बुरख्यातल्या बिब्बीशी प्रणयाराधन
करायला मागेपुढे पहात नाहीत
इंग्रजांनी दीर्घकाळ पाजलेल्या विषाचे परिणाम
इतक्या लवकर ओसरणार नाहीत
आणि टांगा हाकलणाऱ्यातूनही
नबाबाचा दिमाख अजून पुरता गेलेला नाही
'एके काळची राज्य करणारी कौम
हा त्याच्या अंतर्मनातला
अजून प्रभावी असलेला विचार आहे
काही स्वार्थाने व कधी धाकाने
त्याची मते काँग्रेसला मिळतातही
पण मशिदीच्या भिंतीआड
स्वातंत्र्यानंतर जन्मलेल्या पिढीच्या
कोवळ्या मनाला
सतत शत्रुत्वाचा पीळ भरला जातच असतो !
'तू दुष्मनांच्या देशात राहतोस
आणि हे कुफ्र जिंकून
शत्रूला गुलाम अथवा मुसलमान बनवणे
हे तुझे धर्मकर्तव्य होय !'
हे विष त्याच्या रक्तात टोचले जातच असते

कोणत्या राष्ट्रवादी, पुरोगामी पक्षांनी
स्वराज्यानंतर जन्मलेली ही पिढी
पकडण्याचा योजनाबद्ध प्रयत्न केला आहे ?
धर्मनिष्ठा व राष्ट्रनिष्ठा यांतले संतुलन
तिला कोण शिकवणार आहे ?
केनेडीच्या कॅथॉलिकांची निष्ठा
काही इटाली व रोममध्ये नाही
मुसलमानांनी खुशाल हाजला जावे

आणि पश्चिमेकडे तोंड करून नमाज पढावा
पण त्यांच्या निष्ठेचे तोंड
भलतीकडे वळलेले असण्याची गरज नाही
हे या मुलाला कोण सांगणार आहे ?
ते सांगण्याची कोणती यंत्रणा आपल्याजवळ आहे ?
त्यांच्या मदरशातून अजून त्याच पोथ्या आहेत
आणि त्यांच्या बालकमंदिरात
अजून पाकिस्तानातल्या बालकमंदिरांची पुस्तके चालतात !
त्यांच्यावर संस्कार करण्यासाठी
'चिल्ड्रन्स ट्रस्ट'ने किती पुस्तके काढलीत ?
का ती या देशातली नाहीत ?

अल्पसंख्यांतले हे बहुसंख्य
कल्पना करवणार नाही एवढ्या मध्ययुगीन अंधारात
आणि दारिद्र्याच्या कुबट कोंदाटीत
खिचपत पडलेले आहेत
त्यांच्या हालअपेष्टांचे सर्वेक्षण कुणी केले आहे ?
त्यांच्या सर्व सामाजिक प्रेरणा
अल्पसंख्यत्वाच्या गंडाने ( मायनॉरिटी कॉम्प्लेक्स )
विकृत झालेल्या आम्ही ठेवल्या आहेत
म्हणून पिझो व मिझोसारखे त्यांचेही मन परदेशवासी आहे

मुस्लिम जनतेत आर्थिक कार्यक्रम घेऊन जाणे
हा तिच्या प्रतिगामित्वावरील खरा उपाय आहे
आणि पुरोगामी शक्तींपुढे
हे केवढे काम आहे !

सर्व पक्षांनी हे ओळखायला हवे
की दारिद्र्य, अज्ञान व रोगराया

यांना जात, कूळ व धर्म नाही
हे मिशनऱ्यांनी ओळखले
म्हणून आरोग्य, शिक्षण व उत्पादन
यांचा कार्यक्रम घेऊन ते जातात
म्हणून जनमनात त्यांना स्थान मिळते
आणि म्हणून नागांच्या प्रदेशात
इंदिरा गांधीपेक्षा मार्जोरी साइक्स
ही अधिक मोठी शक्ती ठरते.

नवे चंद्र–सूर्य उत्पन्न करण्याच्या
बेतात असलेल्या मानवांच्या युगातही
आणि समन्वयांच्या या भूमीतही
पंथ आणि वंशवादाच्या नावाने
लोकांना पेटवणाऱ्या या शक्ती
त्या पाकिस्तानी पिलबॉक्समधील
शिबंदीसारख्या असतात.
सामूहिक पण संकुचित स्वार्थाच्या चिरेबंदीतून मारा करून,
मोठमोठ्या फौजा त्यांना थोपवून ठेवता येतात
सामान्य माणसाला सतावणाऱ्या
सर्व प्रश्नांचे एक सोपे उत्तर
त्यांच्या मतलबसिंधूतून हलाहलासारखे वर येते
आणि मग हा विखार
आपल्या दैनंदिन व्यवहारात व्यग्र असलेल्या
साध्यासुध्या माणसावर आपला अमल गाजवू लागतो.

जे प्रत्येकाशी आणि नेहमी घटस्फोटाची भाषा बोलतात
आणि ज्यांचे राजकारण राष्ट्रीय पातळी गाठू शकत नाही
त्या प्रतिगामी आणि प्रादेशिक पक्षांना
लोकशाहीत स्थान नाही

पण राष्ट्राचे घर पोखरणारी ही बिळे
नुसत्या निवडणुकीच्या राजनीतीने
बुजवता येणार नाहीत
अथवा कायद्यांनी दडपूनही टाकता येणार नाहीत
कारण या बिळात वावरणाऱ्या जिवाणूंची वीण
राजनैतिक विकृतीच्या पोटातच होत असते

आणि या विकृतीचे आदिम उगमस्थान
माणसाचे न भरलेले पोट हे आहे
बिघडलेले मन हे नव्हे !

६

## वटवाघळे

कारखान्यांकडे जाणाऱ्या विजेच्या तारांवर
काही थिजलेली वटवाघळे लोंबत आहेत
आभाळाकडे पाय करून !
त्यापैकी पहिले वटवाघूळ हेगेलचे आहे
हेगेल हे आकाशस्थ ज्योतींच्या
गतीचा नियम जाणणारे
व तो नियम माणसाच्या प्रगतीला लावणारे
एक तत्त्वज्ञानी वटवाघूळ होते.

आणखी जरा पुढे लोंबते आहे
ते मार्क्स नावाचे वटवाघूळ आहे.
हे वटवाघूळ अधिक व्यवहारी होते.
हेगेलने उगाच आकाशाकडे नजर लावून बसावे
हे त्याला पटत नव्हते
तथापी त्याने शोधून काढलेला
मनुष्याच्या प्रगतीचा नियम
त्याला मंजूर होता.
आणि ही प्रगती ज्या वाटेने

आकाशस्थ ज्योतीपर्यंत पोचवता येईल
ती वाट शोधून काढण्यात
त्याला अधिक स्वारस्य होते–

बिचारा मार्क्स !
या वाटेवर आपल्यालाही उलथेपालथे होऊन
लोंबकळत राहावे लागेल
हे तेव्हा त्याच्या ध्यानात आले नाही.
त्याचे परवाचे तत्त्वज्ञान
हे कालचे व्यवहारज्ञान
आणि आजचे अज्ञान ठरले आहे !
आपल्या जाहीरनाम्यात
मोठ्या आत्मविश्वासाने त्याने उद्घोषिले होते–
वुई शॅल हॅव अॅन असोसिएशन
इन वुइच द फ्री डेव्हलपमेंट ऑफ ईच
इज द कंडिशन ऑफ फ्री डेव्हलपमेंट ऑफ ऑल !
–आपण असा समूह निर्माण करू या
ज्यात प्रत्येकाचा स्वायत्त विकास
ही सर्वांच्या स्वतंत्र विकासाची शर्त असेल !

मार्क्सची भरारी सरळ,
पण दर्शन उलटे होते.
इतिहासाने त्याच्याही प्रेषितत्वाला चकवले.
त्याचे साध्य आणि साधन
यांची उलटापालट झाली
आणि त्याच्या प्रेषितत्वाचे वटवाघूळ
कारखान्याच्या वाटेने जाणाऱ्या
विजेच्या तारांवर थिजून लोंबकळू लागले !
सामाजिक न्यायाचा तो मसीहा

सामूहिक अन्यायाचा पैगंबर ठरला !
त्याच्या अनुयायांनी त्याचे प्रेषितत्व खरे ठरवून
त्याची सर्व भाकिते
टरफलासहित चावून फस्त केली.
अंधार भेदून पाहणारे आपले डोळे
आपल्या साध्यावर रोखून
तो चीत्कारला होता–
जगातील श्रमिकांनो–एक व्हा
व बंड करा––
शृंखलेशिवाय गमावण्यासारखे
दुसरे काहीच तुमच्याजवळ नाही.
आणि राष्ट्रांच्या सीमा तुमच्यासाठी नाहीत.
त्याच्या क्रांतिमंत्रांनी भारलेल्या
अनुयायांच्या निशाचर टोळ्या
जगावर श्रमिकांचे राज्य प्रस्थापित करण्यासाठी
निघाल्या
आणि प्रथम श्रमिकांवर आपले राज्य त्यांनी
प्रस्थापित केले !
आणि स्वातंत्र्याशिवाय आणखी सर्व काही
त्यांनी त्यांच्यासाठी कमावून दिले
आणि राष्ट्रांच्या सीमा वाढवण्यासाठी असतात
हे त्यांनी त्यांना पटवून दिले !
आणि जग एक करू पाहणारे ते–एकमेकाच्या जिवावर उठले–
मार्क्सने भाकीत वर्तवले होते–
राज्ये गळून पडतील
आणि पृथ्वीवरून युद्धे नष्ट होतील.
त्याच्या अनुयायांचा पराक्रम असा की–
ती दैत्याकार विस्तारली
व त्यांचे लोखंडी हात प्रत्येक उमलणाऱ्या

नव्या फुलापर्यंत पोचू लागले
आणि पृथ्वीच्या सर्वोच्च पठारावर
अटल युद्धवादाचे निशाण फडफडू लागले.

साम्यवाद, आजच्या जगाच्या समस्या सोडवू शकत नाही
समस्या सोडवण्याऐवजी तो समस्या निर्माण करतो !
गरीब राष्ट्रांना हवे असते
भाकरीचे तंत्र
त्याऐवजी क्रांतीचे तंत्र तो निर्यात करतो !
आणि सिद्धान्तांची अफू पाजून
नग्न स्वार्थांची सुंदोपसुंदी तो सुरू करतो.
समाज बदलण्यासाठी काळपुरुषाची
ती एक शस्त्रक्रिया ठरण्याऐवजी
बदलत्या समाजाचे ते एक दुखणे ठरले आहे !
तथापी जीवनाचा सुसंवाद
सर्व वादांना कवेत घेऊन
पुढे चालला आहे.
झाकलेली लाल मूठ
उघडी पडत आहे
आणि समृद्धीच्या खजिन्याची चावी
त्या रक्तलांछित मुठीत बंद असल्याचा
भरवसा वाटणारे निराश होत चालले आहेत.
भांडवलशाहीचे वस्त्रहरण करण्याच्या जिद्दीने
ही मूठ आवळलेल्या देशांना
भांडवलशाही देशांच्या गव्हावर जगावे लागत आहे
आणि माओचे महान उड्डाण
ही लाल सरडयाची कुंपणापर्यंतची धाव
ठरली आहे !
अस्वलाने केलेल्या गुदगुल्यांचा आनंद

अखेर जीव घेणारा ठरतो
आणि ड्रॅगनच्या शाबासकीची थाप
ही अखेर 'थाप'च ठरते
हे अजाण, पोरसवदा राष्ट्रांना
कळू लागले आहे.

गोंधळ निर्माण करून सत्ता खेचणे
हा वस्त्रहरणाचाच प्रकार आहे–
भरणाच्या योजना हरणाने पूर्ण होत नाहीत !
आणि स्वतंत्र मनच स्वतंत्र पराक्रम करू शकते.
या मातीच्या लेकरांना
मोकळ्या हवेत वाढणारी
प्रकाशोत्सुक मने आहेत
त्यांची खाड्खाड फॅक्टरी साम्यवाद्यांनी केली.
जेथे स्टॅलिनची कबर उखडून फेकणारा
ख्रुश्योव्ह
जिवंतपणी कबरेत दफन केला जातो
तेथे सामान्य माणसाची कथा काय ?
मन मुरगाळले गेले
की त्याच्या गती खचतात
मनाची झेप कमी पडल्याबरोबर
शरीरही खचते
आणि उत्पादनाची भरारी कोसळून पडते !

माओचे मानसशास्त्र
हे वाळीत टाकलेल्या गुन्हेगाराचे मानसशास्त्र आहे.
वैफल्याने वेढलेले माथे
विद्वेषाने भडकते
महत्त्वाकांक्षेने ताणलेले मज्जातंतू

निराशांनी तुटतात
आणि माणूस वेडाच्या सीमेवरून
वाटचाल करू लागतो.
या वेडचापीराला कोणाचेही सोयरसुतक
व कशाचेही लागेबंधे नसतात.
त्याचा क्रोध व त्याची भीती
वाटेल ते घडवून आणू शकतात.
कोणत्याही क्षणी तो स्फोटाची कळ
दाबू शकतो.
हा चवताळलेला हिंस्त्र शेवटी मरतो
पण मरतामरता तो इतरांना मारीत सुटतो !
माओच्या मनाचा हा रोग
ओळखला पाहिजे
आणि लेनिनच्या भाकिताप्रमाणे
मास्को–पेकिंग–कलकत्तामार्गे
न्यूयॉर्कपर्यंत जाणाऱ्या क्रांतीला
कलकत्त्यापर्यंत आणून पोचवण्याच्या
प्रयत्नात असलेल्या
भारतीय साम्यवाद्यांची
वेळीच दखल घेतली पाहिजे–
त्यांना वाळीत टाकणे हा या रोगावरील
उपचार नव्हे
आणि आता ते एखाद्या कुत्र्यासारखे
लाचार व कमजोरही राहिलेले नाहीत
की ज्याला 'पिसाळलेला व बेइमान'
अशी नावे ठेवून
गोळी घालता येईल !
कुठल्याही शक्तीची उपेक्षा
घातक असते.

आणि ती नुसती कोंडून ठेवणे
स्फोटक असते—
पशुत्व माणसाळणे
व त्याची शक्ती कामाला लावणे
हे माणसाचे मोठेपण
आणि त्याच्या संस्कृतीची कमाई आहे.
केरळातला प्रयोग बंद करून
भारतीय लोकशाहीने मोठी चूक केली आहे.
साम्यवादालाही राष्ट्र लागते
हा इतिहासाचा दाखला आहे.
आणि प्रत्येक राष्ट्रातला साम्यवाद
वेगळा असू शकतो
हे जगाला दिसले आहे.
मजुरांच्या साम्यवादापेक्षा
शेतकऱ्यांचा साम्यवाद वेगळा
तसा बंदुकीच्या नळीतून येणाऱ्या
साम्यवादापेक्षा
मतपेटीतून येणारा साम्यवाद
आणखी वेगळा ठरू शकतो—

लहानशा गोष्टीसाठीही सर्वस्व पणाला लावणे
हे कम्युनिस्टांचे वैशिष्टय आहे
तळहातावर शिर घेऊन निघण्याचे साहस
हे त्यांचे सामर्थ्य आहे.
एकदम बाजी लावून,
आणि ठाण मांडून बसण्याची
जिद्द त्यांच्याजवळ आहे.
पण ते आपल्या अघोरी तंत्रमंत्रांचे
गुलाम झालेले आहेत !

त्यांना या गुलामीतून वर येण्याची संधी
या महान राष्ट्राने उपलब्ध करून दिली पाहिजे
आज त्यांना घाई आहे
राम्याच्या घरातले घेऊन
सोम्या व गोम्याच्या घरांत टाकण्याची,
एकाचे नेसते काढून, तिघांचा नागवेणा
झाकण्याची.
पण कोठेतरी एका कोपऱ्यात
त्यांना कळून येऊ द्या–
की या वाटणीने अखेर तिघेही उपाशी
आणि सर्वच नग्न राहणार आहेत !
आतडे कुरतडायला लागले की हे कम्युनिस्ट तंत्र
दुसऱ्याच्या शेतातले पीक कापायला निघते
पण ते कुरतडू लागण्याआधी
अन्न पिकवण्याची काही एक योजना
आखून अमलात आणण्याची संधी
त्यांना मिळायला हवी आहे–
दुधाचे वाहन चालले आहे लुटून घ्या व वाटून द्या–
गोसंवर्धन कसे करायचे ते नंतर पाहू
हे त्यांचे तर्कशास्त्र आहे !
रशियन कढईतून तळून आणलेली राजकारणाची पुरी
या अर्धपोटी देशाला खाऊ घालण्याच्या प्रयत्नात,
त्यापैकी काहीजण केव्हापासून आहेत.
काही पांढराफटक पडलेल्या या देशाला
मंगोलियन रक्त देऊन उठवण्याच्या
बेतात आहेत–
पण हे दोन रक्त–समूह आपसात जुळत नाहीत
आणि रक्ताल्पतेच्या रोग्याला मांसाहर पचत नाही
त्यांना कळायला हवे आहे

की हा मरणोन्मुख, जीर्ण रोगी
उठून उभा राहण्यासाठी पाहिजे आहे
इथल्याच शेतात पिकलेल्या फायरग्लोब टोमॅटोचे सूप
आणि याच मातीत उत्पन्न झालेल्या समृद्धीच्या गोमातेचे दूध.
सर्वांची कसोटी अखेर
ही जमीनच घेणार आहे-
या देशातील केवळ डाव्या-उजव्या साम्यवाद्यांचेच नव्हे
तर सर्व साधनशुचितावाद्यांचे
राष्ट्रवाद्यांचे, स्वातंत्र्यवाद्यांचे
संस्कृतिवाद्यांचे व अध्यात्मवाद्यांचे मूल्य
इतिहास अखेर तिलाच विचारणार आहे !

७

## पंख तुटके प्रकाश–पक्षी

दिवाभीते व वटवाघळे ही रात्रीची प्रजा आहे
अंधारातून अंधाराकडे जाणारे त्यांचे मार्ग असतात.
आणि त्यांचे मार्गक्रमण
नव्या पहाटेला पाठमोरे असते
पण उगवत्या सूर्याचे उत्कंठ स्वागत करणारे
काही प्रकाशपूजक पक्षी असतात
सूर्याचे दर्शन आधी त्यांना होते
नव्याने फाकणाऱ्या प्रेरणांचा स्पर्श
आधी त्यांच्या पंखांना होतो
आणि त्यांच्याच स्पंदनांनी
जीवनाला प्रत्येक नवी जाग येत असते.

पण प्रकाशाच्या या राजदूतांनाही
अहंकाराची बाधा आणि यादवीचा शाप असतो
जेव्हा प्रकाशाचा वेध घेण्याच्या घाईत
ते एकमेकांशी भांडू लागतात
आणि एकमेकांच्या चोचींनी
एकमेकांचे पंख छाटून टाकतात

तेव्हा सूर्याचा चेहरा काळवंडतो
जीवन गोंधळून थबकते
आणि दिवाभीते आपल्या ढोल्यांतून
डोळे मिचकावू लागतात !
समाजवाद हा जीवनाचा नूतन प्रकाश होता

तो प्रथम पाहणाऱ्या युगाच्या राजदूतांनो,
तुम्ही जीवनाची अपेक्षा पूर्ण केली नाही
उदयोन्मुख समाजवादाचा संदेश
तुम्ही प्रथम ऐकला व ऐकवला
पण समाजवाद तुम्हाला जगता आला नाही
आणि समाज करून जगण्यासाठी
हवे असलेले गुण
तुम्हाला अंगी बाणवता आले नाहीत
त्यामुळे प्रजा एकीकडे, समाजवादी दुसरीकडे
आणि पक्ष तिसरीकडे अशी तुमची
स्थिती झाली आहे !

तुमच्याजवळ तपस्या आहे
मानवतेची ऊब आहे
उन्मुक्त मन आहे
बुद्धीची झेप आहे
खालच्या व मधल्या थरांतून वर आलेले
तुमचे नेतृत्व आहे
त्याला व्यापक समज आहे
सत्तारूढांच्या नेतृत्वाला तुल्यबळ
आणि त्यांच्या गुरुस्थानी शोभणारे
प्रतिभेचे महामेरू तुमच्याजवळ आहेत.
तथापी आपल्या उंचीची अंधारी

तुमच्याही डोळ्यांसमोर आली
आणि इतरांवरील राग परस्परांवर काढण्याची
गल्लत तिच्यामुळे झाली !

उजव्या अंगाला अर्धांगवायू झाला आहे
डाव्या अंगाला अपस्माराचे झटके येत आहेत
आणि या धकाधकीत
हृदय जायबंदी होऊन इस्पितळात जाऊन पडले आहे !

एके काळी अहिंसेची दीक्षा घेतलेल्यांच्या तोंडी
'घेरा डालो !' 'बंद करो'च्या गर्जना
आणि सशस्त्र संघटित हिंसेची भाषा आली आहे
ही वैफल्याची वीरश्री आहे
जे मतपेटीतून मिळत नाही
ते हातांनी हिसकावून घेण्याचा हा पांगळा प्रयत्न आहे
आणि लोकशाहीचे शरीर लोकसभेत नग्न करण्याचा
हा आंधळा आवेश आहे
पेटी ओढाल, पण पेटी सुरक्षित ठेवणारे
घरच पेटेल !
आणि त्या पेटत्या घरावर जेव्हा अखनूर व तेजपूरमार्गे
रणगाडे चालून येतील
तेव्हा ती मतपेटी पुन्हा डोळ्यांनी दिसणार नाही !
वादळ उठवता येईल
पण त्याचे नियंत्रण करता येणार नाही
( नेत्यांचे सद्हेतू अनुयायांना पेलत नाहीत हा इतिहास आहे )
आणि त्यांनी निर्माण केलेल्या
वादळवाऱ्याने आपली शिडे भरून
आपले काफले पुढे नेणारे
दोस्तभाई टपून आहेत

ही युती तुल्यबळांची असणार नाही–
कारण साथींना स्वतःचीही पुरेशी साथ नाही
भाईंच्या मागे मात्र जागतिक शक्ती उभ्या आहेत !

सर्व विरोधी पक्षांचे धुळीचे लोट उठवून
त्या धूळकल्लोळातून डाव्या साथींना
आपला रथ सुसाट दामटायचा आहे
उजव्या साथींच्या ध्येयवादाचा गाडा
मजबूत आहे
गाडी चालवण्याचे तंत्रही ते जाणतात
परंतु इंधन कमी पडत आहे
आणि इतर विरोधकांच्या धूळकल्लोळात
रस्ता गावत नाही म्हणून बाजूला
उभे राहण्याचा प्रसंग प्राप्त झाला आहे.
आणि या दोघांच्या भाऊबंदकीत
जागीच खिळलेल्या लाल झेंडीने
पुरोगामी शक्तींचीच गाडी रोखून ठेवली आहे !
भाऊबंदकी ही हाडवैराहून अभेद्य असते
पुढील निवडणुकीने दगा दिला तर
आपटी खाल्लेले प्रजा समाजवादी
एकवेळ काँग्रेसमध्ये जातील
व समाजवादी, कम्युनिस्ट प्रबल झाले
तर त्यांच्यांत शिरतील
पण भाऊ भाऊ एक होऊ शकणार नाहीत !

हे ध्येयवादांचे तत्त्वशुद्ध भांडण आहे
की माणसांच्या न झिजणाऱ्या कंगोऱ्यांचा दुर्विलास ?
आपसातल्या भांडणांनी
या नेतृत्वाने आपली विश्वसनीयता गमावली आहे

ते प्रामाणिक आहे व तळमळीचे आहे
पण प्रामाणिकता–ऑनेस्टी–ही एक चीज आहे
आणि विश्वसनीयता–रिलायबिलिटी–ही दुसरी
ही विश्वसनीयता उद्याच्या आश्वासनांनी येत नाही
आजच्या इसाराने येते !
जनतेला हे कळले पाहिजे की आल्यावर
हे असे करतील...
आणि हे कुठल्याही धूळकल्लोळातून कळत नाही
वृत्ती व कृती पक्व झाल्याशिवाय
कर्तृत्व सफल होऊ शकत नाही.
सर्वात खालच्या पायरीवरून अगदी वरच्या पायरीवर
पाय ठेवण्याची धडपड यशस्वी होऊ शकत नाही
एकेक पायरीच वर नेऊ शकेल
पहिल्या गोष्टी प्रथम व्हाव्या लागतील
त्यासाठी धीर आणि तकवा धरावा लागेल.
फावडे, तुरुंग आणि मतपेटी
यापैकी फावड्यांचा उपयोग प्रथम करावा लागेल
प्रदर्शनांपुरता व महोत्सवांपुरता केलेला
तो चालणार नाही
फावड्यांचे कर्तृत्व
आणि मतपेट्यांतील नेतृत्व
हातांत हात घालून जातील
तेव्हाच देश त्यांच्या मागे येईल
पोट भरण्याचा पराक्रमी मार्ग जे दाखवतील
त्यांची पेटी भरल्याशिवाय राहणार नाही !
अन्यथा तेही जुगाऱ्यासारखे
सोंगट्यांचे दान टाकत राहतील
आणि ते पडले नाही म्हणून वारंवार
त्यांची नरद बावरी होत राहील

समाजवादी झोपडीत उंदीर असेच दंड पेलत बसतील
आणि वडाच्या झाडावरील पाखरे सैरभैर होत जातील
आणि भारतातल्या फेबियन समाजवाद्यांच्या भूमिकेत,
दैन्यदारिद्र्याशी लढण्याची तालीम
त्यांना न्हाणीघरात व मुदपाकखान्यात चालवावी लागेल
विप्लवांचा नगारा त्यांना वाजवता येणार नाही
बुद्धिवादी टीकेची सनई फार तर त्यांना आळवता येईल
समाजक्रांतीची संहिता फार तर ते सांगतिल
प्रजेच्या क्रांतीचे शस्त्र मात्र त्यांना परजता येणार नाही
आणि त्यांचा पराभव हा जीवनमूल्यांचा पराभव ठरेल
कारण सच्च्या, पोटतिडिकीच्या
आणि निष्कलंक निष्ठेच्या ऊर्मींनी
अवसरनिष्ठ अवडंबरवादी
आणि जन्मद्रोही वृत्तीपुढे
हार पत्करणे
हे, जीवनात जे काही प्रकाशपूजक
आणि उर्ध्वमुख आहे
त्याचाच पराभव आहे
आणि तुम्हाला ग्रासत चाललेले वैफल्य
हा राष्ट्रव्यापी वैफल्याचा सर्वात सघन आविष्कार आहे
जे कालबाह्य आणि कालद्रोही
तेच फक्त भावी विजयाच्या नशेत
आत्मतुष्ट आहे
त्यांची आत्मतुष्टी त्यांना लखलाभ असो
पण दूध आटलेल्या स्तनांशी
बाळासाठी उंदराच्या विषाची गोळी ठेवणाऱ्या
त्या शतकाशतकांच्या आईला
मते मागायला जाताना
शिव्या आणि अश्रू याशिवाय
तुम्ही आणखी काय नेणार आहात ?

८

# म्हातारा फिनिक्स

काँग्रेस ही इतिहासातली, निःशस्त्रांची
सर्वांत मोठी संघटना आहे,
गुलामीच्या राखेतून फडफडत उठलेल्या
देशाच्या आत्म्याचे ते भव्य शरीर आहे
काळाने त्याची शक्ती पाहिली आहे
जगानेही ती ओळखली आहे
धुळीने माखलेले व निःशस्त्र लढणारे
त्याचे पिळदार स्नायू
खेड्यापाड्यांतल्या बायाबापड्यांनी
पाहिलेले आहेत.

तथापि ऐंशी वर्षांचा हा म्हातारा
आता थकला आहे!

राज्यशकट हाकणारे बैल पुष्ट झाले आहेत
पण गाडा खिळखळा झालेला आहे!
खिळखिळ्या गाड्याची खिरोटी
पुनःपुन्हा गळून पडत आहे

( त्यात कामराज आपले बोट
किती दिवस घालीत रहाणार आहेत ? )
या महावृक्षाची पाळेमुळे
स्वातंत्र्ययुद्धाच्या परंपरेने
जनमनात दूरवर, खोलवर पोचली आहेत
पण स्वार्थाच्या दलदलीत ही मुळे कुजत चालली आहेत
अकर्मण्यतेची कीड बुंधा पोखरीत आहे
बांडगुळांनी त्याच्या जीवनरसाचे शोषण चालवले आहे
वारसा-हक्काचा कलकलाट त्यांच्या अंगाखांद्यावर
बसून चालला आहे.
आणि ज्यांनी आजवर त्याची फळे खाल्ली
तेच आता त्यांच्या फांद्या छाटायला निघाले आहेत !

कधीकाळी या महासंघटनेचे हात बळकट करणारेच
तिच्या प्रगतीचे पाय घट्ट धरून ठेवीत आहेत
उसनवारीचा समाजवादी वेष तिने घातला आहे
पण तिचे लक्ष वॉल स्ट्रीटच्या सुटातल्या शेठियांकडे आहे.
जॉन्सनकडून मिळवलेल्या सुवर्णमुद्रांच्या व अन्न-नौकांच्या संख्येत
तिला आपले यश मोजावे लागत आहे !
एका पायात शुभ्र मुलायम अमेरिकन जोडा
आणि दुसऱ्यात लाल रशियन बूट घालून
तिचे लेफ्ट राईट जागच्याजागी सुरू आहे !
पुंजीपतींच्या चौऱ्यांशी पेढ्यांनी
देशाचे संपूर्ण अर्थतंत्र काबीज केले आहे
आणि सर्व तथाकथित वादांची उतरंड रचून
त्यावर दादा स्वार झाले आहेत !

परिस्थिती कशीबशी काबूत ठेवण्यापुरते
आणि ढकलगाडा चालू ठेवण्यापुरते

दा. क्र. ९६२
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

तिचे कर्तृत्व दिसते
मते मिळवणारी यंत्रणा तिच्याजवळ आहे
पण रखडणाऱ्या परिस्थितीला
अणु-युगातील गती देणारी ताकदवान इंजिने
तिच्याजवळ नाहीत.
विशाल मानवी समुहांचा उत्साह
आणि सर्जनशक्ती निश्चित दिशांनी गतिमान् करणारे
दुसऱ्या व तिसऱ्या पातळीचे नेतृत्व
तिने तयार केलेले नाही.
त्यामुळे क्रांतिकारी परिवर्तनाऐवजी
दबून केलेल्या गौण सुधारणांवर
तिला समाधान मानून घ्यावे लागते.
जेथे कठोर निर्णय अनिवार्य
तेथेही तिला तडजोड स्वीकारावी लागत आहे
आणि आपल्याच गोटांतल्या लढाया
निस्तरण्यात तिची ताकद आणि वेळ
खर्च होत असतो.
नोकरशाहीच्या सुस्त अजगराचा
लोकशाहीभोवती पडलेला विळखा
सोडवण्याचे त्राण तिच्यात उरलेले नाही.

कोडाईकनालच्या प्रवाहात पोहणारा कामराज
हिंदी राजकारणाच्या महासागरात पोहू लागला
तेव्हा त्याच्याकडून अपेक्षा होती
की सामान्य माणसाच्या गर्दीतून वर येऊन
एवढी ताकद कमावलेला
आणि आपल्या कामनेप्रमाणे राजा घडवणारा
हा निष्काम चाणक्य
काँग्रेसचे नवे मन आणि नवे शरीरही घडवू शकेल

पण महासागरात पोहता पोहता
त्याच्याही नाका-तोंडात लहरी लाटांचे पाणी शिरले आहे
कारण त्याचीही भूमिका
निवडणुकीच्या भट्टीवर तापणाऱ्या
राजकारणाच्या तव्यावर
गुलाबी चणे घोळत बसलेल्या
भटाऱ्याचीच आहे.
त्याला कळायला हवे आहे
की चणे-कुरमुरे ही तीर्थयात्रेच्या कामी पडणारी
जुनाट शिधा-सामुग्री आहे
लोकशाही हे कुरमुरे जास्त दिवस खात बसणार नाही
सँडविच बेकरीचे युग येथे केव्हाच
सुरू होऊन चुकले आहे !

हे सँडविच तयार करताना
आपल्या राजकारणाच्या स्लाइसला
एकीकडून लाल रशियन टोमॅटोचा सॉस
आणि दुसरीकडून शुभ्र अमेरिकन बटर
कॉंग्रेसने खुशाल लावावे
पण स्लाईससाठी लागणारे पीठ मात्र
भारतीय गव्हाचे पाहिजे !

त्यासाठी मात्र विदेशावर अवलंबून राहाणे उपयोगी नाही
या स्लाइसला लागणाऱ्या गव्हासाठी
शेतातली निर्मिती आणि बेकरीतल्या प्रक्रिया
पराक्रमाच्या ध्येय-संकल्पाने चालवणारे प्रकल्प उभारीत
देशभर जनतेतून तो फिरला
तर भटाऱ्याऐवजी भाग्यविधात्याची भूमिका
त्यालाही बजावता येईल

६७ ची निवडणूक
काँग्रेसला अखेरची संधी देणार आहे
पुढील पाच वर्षे देशाला असोत नसोत
तिला मात्र आणीबाणीची ठरणार आहेत
कोरॅमिनचे इंजेक्शन देऊन जिवंत ठेवलेल्या
रोग्यासारखी ती शिल्लक राहणार
की नवा जन्म देणाऱ्या आत्माहुतीसाठी
म्हाताऱ्या फिनिक्सप्रमाणे ती सिद्ध होणार
हा प्रश्न, ही निवडणूक तिच्यापुढे टाकणार आहे
मात्र ही आत्माहुती म्हणजे
आत्महनन अथवा विसर्जन नव्हे
ते एक नवसर्जन आहे
त्यालाही एक प्रक्रिया आहे
आणि त्याचेही एक तंत्र आहे !

९

# रेतीचे बांध

विनोबांचे ॠण फिटणार नाही
असे वातावरण त्यांनी तयार केले आहे
निष्ठेने एक माणूस बाहेर निघाला
आणि एवढे करू शकला.
या निष्ठेने आणि तळमळीने
आपल्या पक्षप्रचारासाठी कोणता नेता निघाला आहे ?

विनोबांच्या माणसांचा तकवाही
कमालीच्या बाहेर आहे
ज्यांना पायतणांची फिकीर नाही
आणि सुपारीच्या खांडाचे व्यसन नाही
असे हे हजारो हजार परिव्राजक
देशभर खेडीपाडी जागवीत फिरत आहेत
हे चित्र किती वेधक आणि प्रेरक असावे !
तथापी ही प्रेरणा आपला प्रभाव व वेध
हरवून बसली आहे
भूदानमूलक अहिंसक क्रांतीचा अग्रदूत
बिहारच्या भूमीत ग्रामदान तुफानाचे नेतृत्व करण्यासाठी

स्वतः हजर असताना
पाटणा पेटवले जाते
आणि गावागावात शिरलेला दुष्काळ चुकतो
तो जॉन्सनच्या गव्हाने व स्पेशल मालगाड्यांनीच !

गेली पंधरा वर्षे वातावरण तयार होतच आहे
तथापी त्याने भारतीय मनाची पोकळी वाढवण्याचेच
काम केले आहे
नुसते वातावरण तयार करून भागत नाही
वातावरणावर मात करणारे मन तयार करणे
हे खरे काम आहे
निर्मितीच्या कोवळ्या उन्हात
या कुडकुडणाऱ्या मनाला ऊब देण्याचे कार्यक्रम
हे आंदोलन देऊ शकले नाही
त्याने माणसाच्या मनोवृत्तीबद्दल
काही सरळधोपट बालबोध गृहिते मांडली
आणि त्यावर प्रमेयांची एक सुटसुटीत उतरंड उभारून
प्रवचनांच्या माऱ्यांनी आणि कागदी प्रतिज्ञालेखांनी
जग सुधारण्याची आशा बाळगली
संतांना संतांचेच मन समजते काय ?
आणि आत्मतुष्टीची नशा त्यांच्याही मनःस्वास्थ्यासाठी
हवी असते काय ?

पाकक्रियेच्या पुस्तकांसारखे
असे केले म्हणजे तसे होईल
असे हे सिद्धान्त सांगतात
पण भुकेजलेल्या माणसाला
पुस्तकातली पक्वान्ने तृप्ती देत नाहीत
ते रोगाची अचूक निदाने करतात

आणि औषधेही सांगतात
पण ही औषधे कुठे मिळतील
हे ते सांगत नाहीत
ही औषधे औषधांच्या चालू दुकानात मिळत नाहीत
आपली दुकानेही ते उभी करीत नाहीत
नुसती हवा तयार करता करता
आणि नुसते विचार देता देता
सर्वोदयातही आचार व विचार यांची फारकत झाली आहे.
सर्वोदयपात्रातून जनआधारित कार्यक्रम
आणि जनशक्ती निर्माणाची महास्वप्नेही
कागदावरच राहिली आहेत
त्या मडक्यांचीही किंमत भरून निघाली नाही
अशी वस्तुस्थिती आहे
या सर्वोदयपात्रातून निघालेल्या फलितांचे सर्वेक्षण करून
त्याचा आढावा समाजापुढे मांडला गेला
म्हणजे कळेल
की भूदान, ग्रामदान, प्रखंडदान, अखंडदान
आणि तुफान
या विस्तारांचे भविष्यही तसेच असण्याची भीती आहे

कारण भिकेचे वाडगे याही कार्यक्रमांच्या हातात आहे
निर्मितीचे आव्हान त्यांनाही स्वीकारता येत नाही
ते आमचे काम नव्हे म्हणून
नवे इष्टांक गाठण्यासाठी
परिव्राजक भिक्षूंची सेना
पळवाटेने मोकळी होत आहे
त्यामुळे आपले काठ न पिकवता पुढे पळणारी ही भूदान-गंगा
गंगेऐवजी गुप्त सरस्वतीच ठरली आहे.
चिंतनाच्या पातळीवर विज्ञानाचा महिमा गातागाताच

कर्माच्या पातळीवर ते त्याचा तिटकारा करीत असतात
जात्याने दळलेल्या पिठाच्या भाकरीच चघळत
समाजाने बसावे असा सात्त्विक आग्रह ते धरतात
सामान्य माणूस ब्रह्मचर्याने संततिनियमन का करू शकत नाही,
याचे त्यांना नवल वाटते व संताप येतो.
विदेशी विज्ञानाचे कलम
देशी रानबोरीवर बांधून
मोठे पेवंदी झाड तयार करण्याचे हे युग आहे
फुटलेले अणुगर्भ प्रमाणबद्धपणे जोडून
प्रचंड नवनिर्मिती शक्य करणारे हे युग आहे
विज्ञानाची कास धरून
आणि अनुदानांच्या जिवावर चाललेल्या
सुतकी कर्मकांडांच्या कोंडीतून बाहेर पडून
हे आरोहण निघाले असते;
तात्त्विक घटपटाशी झटापट करण्याऐवजी
सामूहिक हातांच्या पकडीत समस्या ठायी ठायी टिपण्यात
आल्या असत्या
तर तरुणांची सेना तिकडे आकर्षित झाली असती
त्यामुळे सर्वोदयाची जनमानसातील प्रतिमा,
राजकारणाच्या धकाधकीने खचलेल्या,
अथवा तारुण्यातही सुरकुतलेल्या मनांचा भारदस्त सूर्यास्त
अशी आहे.
अजूनही त्यातले काही
नको नको म्हणत
राजकारणाचा कांदा हुंगीत असतात
त्याचा दर्प पेलला नाही
म्हणजे फटाफट शिंकाही देतात
खायचे नाही, पण हुंगायचे, असा हट्ट का ?
म्हणूनच सर्वोदयातील अपक्षवादाबद्दल

कोणत्याही पक्षात आदर नाही
आणि केवळ बोधामृत पाजणारी
व युक्तीच्या चार गोष्टी सांगणारी
अशी ही शक्ती राहिलेली आहे.

अपक्ष लोकशाहीवाद्यांची संमेलने
हाही प्रलयाच्या भरतीला
रेतीचे बांध घालण्याचा आणखी एक प्रयोग आहे.
उंटावरून शेळ्या हाकण्यातला
अथवा हस्तिदंती मनोऱ्यावरून फुंकर घालून
पेटलेले शहर विझवण्याचा
किंवा तापाने धगधगणाऱ्या शरीरावर
बर्फाची थंड पिशवी ठेवण्यातलाच
हा प्रकार आहे
बर्फाची पिशवी माथ्यावर ठेवून
तापमान कमी होईलही कदाचित्
तथापी त्यामुळे मूळचा रोग दुरुस्त होऊ शकत नाही.

या अपक्षवाद्यांची भूमिका जाणून घेण्याच्या परिस्थितीत
मतदारांचा कितीसा अंश आहे ?
देशाची लोकशाही हे एक बिघडलेले प्रश्न-बालक
( प्रॉब्लेम चाइल्ड ) असले
तरी जेथे समस्या आहे तेथे- न पोचणारी
ही अपक्ष मंडळी आहेत
त्यांचा प्रामाणिकपणा, बुद्धिमत्ता व कळकळ स्तुत्य
पण आतड्याला पीळ पाडणारी भूक
न अनुभवलेल्यांची ही जमात आहे
त्यामुळे तिच्या भूमिकेचा चेहरा
भुकेल्यांची लोकशाही ओळखू शकणार नाही.

ही भूमिका निवाडा देणाऱ्या प्रज्ञावान सरन्यायाधीशाची आहे
पण या निवाड्याची तामिली करणारे कोण आहेत ?
अपक्ष भूमिकेची विस्तार-यंत्रणा कोठे आहे ?
जी तिला दिल्लीतल्या रवींद्रभवनाबाहेर
गल्लीतल्या मतदारापर्यंत पोचवू शकेल ?
अपक्ष विचारसरणी झाली
पण अपक्ष कार्यक्रम कोठे आहे ?
तो अमलात आणणारी
अथवा आणायला लावणारी
ताकद कोठे आहे ?
ती उभारण्याची योजना तरी कोठे आहे ?

## १०

## माती जागवील त्याला मत

या पोकळीतही मला उदंड आशा वाटते.
या भूमीत प्रचंड शक्तीचा झोपलेला सागर मी पाहतो.
तिच्याजवळ तिच्या आदिम परंपरेचा
सारा वारसा कायम असूनही
नव्याचे स्वागत करायला ती उत्सुक आहे.
तिची उद्यमशीलता मेलेली नाही
हे पाकशी झालेल्या युद्धात दिसून आलेले आहे.
शेकडो मुलकी ट्रक–चालकांनी
मृत्यूच्या जबड्यातून सैन्यसामग्री वाहण्याचे काम
अहोरात्र केले.
आणि कारागिरांनी या वाहनांच्या विनामूल्य दुरुस्तीसाठी
आपली वर्कशॉप्स
स्वयंस्फूर्तीने सरहद्दीलगत थाटली.
गृहिणींनी रणांगणावरील सैनिकांपर्यंत
जेवण पोचते केले.
कोणता इतिहास हे विसरू शकणार आहे ?
आणि जो विशीपंचविशीचा जवान
युद्धात अहमहमिकेने मरायला तयार आहे

तो काम करायला तयार नाही
हे पटत नाही.
जवानांना उत्स्फूर्त करणारे नेतृत्व लाभले
आणि त्यांना रणगाड्यांच्या लोंढ्याशी
टक्कर घेण्याची ताकद आली.
तसे किसानांना उत्स्फूर्त करणारे कृतिशील नेतृत्व मिळाले
तर तेही या देशात ठाण मांडून बसलेल्या
दुर्भिक्ष्याला यशस्वी टक्कर देऊन
सीमेपल्याड हाकलतील !

या भूमीत कटुता व विद्वेष कायम टिकत नाही.
वंशच्छेदाचे वा धर्मच्छेदाचे पाप
या भूमीच्या रक्तात नाही.
जनमनात दडलेली शुभेच्छा व सुजनता आहे.
ह्या सर्व ताकदींना वर उचलून
रस्ता दाखवायचा आहे.
तो दिसला तर वाटचाल करणारे पाय
आपोआप पुढे सरसावतील
आणि भेडसावणारे हे दिवस नाहीसे होतील
जणू कधी नव्हतेच !

भारतीय पक्षनेतृत्व ही ऐतिहासिक कामगिरी
बजावू शकेल असा माझा विश्वास आहे.
भारताच्या लोकशक्तीचे
हे सर्व उचंबळणारे प्रवाह आहेत
आणि प्रवाह हा नेहमीच पुरोगामी असतो.
पुरोगामित्वाचा गुणधर्म
हा वर चिकटवलेल्या, लालपिवळ्या लेबलांवर
अवलंबून नाही

प्रत्येक पक्षातल्या व्यक्तिघटकांबरोबरच
त्याचे मनही बदलत आहे
हे लेबलांचे राजकारणही
या निवडणुकीत टरकावले जाणार आहे

नेतृत्व आणि कर्तृत्व
हातात हात घालून गेले
म्हणून गांधीजींनी खेड्यापाड्यातले
अज्ञान राष्ट्र उठवले
प्रत्यक्ष आंदोलनाभिमुख राजकारण
आणि उत्पादनाभिमुख विधायक कार्य
हे दोन्ही पंख उभारून
आता सर्व भारतीय पक्षांचे गरुड उडले पाहिजेत
त्या पंखांची ऊब
या उघड्यानागड्या कुडकुडणाऱ्या देशाला
मिळाली पाहिजे.
या भरारीत मरण आले
तरी ती ऊब कधी विसरली जाणार नाही !

प्रत्येक लढाऊ पक्षाला एक राखीव सेना लागते
जनसंघाचा संघ,
कॉंग्रेस व समाजवाद्यांची सेवादले
विभिन्न पक्षांच्या मजूर व युवक संघटना
या सर्व राखीव सेनाच आहेत !
तथापी आतापर्यंत
प्रत्येकाचा जोर या रिक्रूटांची
मने व मते बदलण्यावरच होता
हातांकडे कुणाचेही लक्ष नव्हते !
मतपेटीशी प्रियाराधन करणाऱ्यांनी

मातीवर धुंद प्रेम कधी केलेच नाही !
त्यांना राष्ट्रीय पातळीवर तशी संधीच मिळालेली नाही
कारण राजकीय परिस्थिती इतकी परिपक्व नव्हती
जेते विजयाच्या नशेत
आणि पराजित प्रतिक्रियांनी पछाडलेले होते !
या प्रतिक्रियांच्या कोलाहलातून
भारताचे राजकीय मन
आता कोठे अंतर्मुख होत आहे.
ही निवडणूक त्यांना
आणखी अंतर्मुख व्हायला लावणार आहे.
बहुपक्षीय लोकशाहीचा एक अभिनव प्रयोग
निसर्गक्रमाने उत्पन्न होऊन
देशात चाललेला आहे.
तो कायदेमंडळातून कर्मभूमीपर्यंत उतरवण्याची तयारी
आता करावी लागणार आहे.
सीमांच्या संरक्षणासाठी
जर सर्वपक्षीय समान कार्यक्रम असू शकतो
तर भुकेशी लढण्यासाठी
एक समांतर कार्यक्रम का असू नये ?
सर्व उपलब्ध शस्त्रास्त्रांनिशी
या सामान्य शत्रूविरुद्ध
एक सर्वपक्षीय मोर्चा कसा उभारता येईल ?
या प्रश्नाचे उत्तर पुढल्या पाच वर्षांना
द्यावे लागणार आहे.
यानंतर केवळ आश्वासनांचे फुटके फिडल वाजवून
अखिल भारतीय नभोवाणी
गाजवता येणार नाही
आणि मतांची भीकही मागता येणार नाही.
दिल्लीच्या दरबारात बसून

समृद्धीचे सुसंवादी संगीत ऐकण्यासाठी
उत्पादनोन्मुख, प्रत्यक्ष कार्यक्रमांचा रियाज
या भारतीय पक्षांना वर्षानुवर्षे करावा लागेल.
सामान्य माणसांची
बेकार तरुणांची
झोपलेल्या माळरानांची
वाळून चाललेल्या नदीनाल्यांची सुप्त शक्ती
प्रत्यक्ष कृतीच्या गुदगुल्यांनी जागवावी लागणार आहे.
म्हाताऱ्या धरित्रीच्या हाडापर्यंत भिडलेला शीण
झडझडून टाकावा लागेल.
मातीच्या कणाला निर्मितीची फुंकर घालून
तो सोन्याचा करण्याची ही किमया आहे.
क्षणाक्षणाला व कणाकणाला
सर्जनाची ही फुंकर घालीत,
माती जागवीत
समृद्धीच्या वाटेने जे जातील
तेच दिल्ली गाठू शकतील !
मग मतदारांकडे
मतांची भीक लाचारीने व कोडगेपणाने
मागण्याचे कारण राहणार नाही

भीक मागणारे नेतृत्वच
भीक मागायला लावते !
ज्या पक्षाजवळ असा पोट भरण्याचा कार्यक्रम आहे
त्याची पेटी भरल्याशिवाय राहणार नाही !
ही वाटचाल अत्यंत धिमी वाटेल,
पण त्याने दूरवर्ती ध्येयाचे बोट
एकदम हातात येईल

आणि वाटचाल निश्चितपणे ध्येयाकडे
होत असल्याचा इसार सतत मिळू लागेल
प्रारंभी
अनेक विसंगती आणि वैफल्ये
यांना तोंड द्यावे लागेल
माणसांची अडचण भासेल
परिस्थितीशी दैनंदिन सामना द्यावा लागेल
स्वतःशी व आपले म्हणवणाऱ्यांशी
झगडण्याचे अनेक प्रसंग येतील
तपशीलांच्या गुंताळ्यात अडकल्यासारखे
आणि जबाबदारी ओझ्यांनी चिरडल्यासारखे वाटेल
पण युद्धाच्या भूमिकेतून
या सर्व गोष्टींचा स्वीकार केला
की कष्टाची तमा वाटणार नाही
प्रत्यक्ष आंदोलनात्मक राजकारण
काही कमी कटकटीचे व धकाधकीचे असत नाही
दिल्लीवरील एक मोर्चा
अथवा एक ‘ बंद ’ आयोजित करण्यात
कमी शक्ती खर्च होत नाही
देशाचे जयगान आंतरराष्ट्रीय सीमांवर गाजते ठेवण्यासाठी
अशी खूप गाडून घेणारी माणसे
खूप पिचणारे कणे
धपापणारे श्वासोच्छ्वास
अश्रू आणि घाम आवश्यक आहे !

## ११

## एक आघाडी : समान्तर कार्यक्रम

■ प्रत्येक पक्षाच्या रचनेत काही लढाऊ आणि विध्वंसक वृत्तीचे, तर काही सहिष्णू व विधायक गुणधर्माचे घटक असतात. हे विधायक घटक सर्वांशी जुळू शकणाऱ्या रक्तसमूहाप्रमाणे ( युनिव्हर्सल ब्लड ग्रुप ) असतात. ते तोडण्यापेक्षा जोडण्याकडे स्वभावाने प्रवृत्त असतात. हीच खरी पक्षाला एकत्र ठेवणारी शक्ती ( सिमेंटिंग फोर्स ) असते. तिच्याशिवाय पक्ष अथवा संघटन उभे राहू शकत नाही. प्रत्येक पक्षातील या शक्तीचे तोंड जमिनीकडे वळवणारा, आणि ही वळलेली शक्ती कामी लावण्यासाठी जमीन उपलब्ध करून देणारा एक रोखठोक व सुसूत्र कार्यक्रम कसा आखता येईल ?

■ प्रत्येक पक्षाला आपला बालेकिल्ला आहे असे वाटणाऱ्या क्षेत्रात, अनुकूल ठिकाणे व साधनसामग्री पाहून पक्षाच्या संचालनाखाली कृषिऔद्योगिक उत्पादनाभिमुख ( प्रॉडक्शन ओरिएंटेड ) प्रकल्प हाती घ्यावे लागतील. या प्रकल्पांचे पुढील मुख्य उद्देश असू शकतील :

: पक्षाला अभिप्रेत असलेल्या समाजरचनेचे साकार आदर्श उभारण्याचा प्रयत्न.

: पक्षसंघटनेचा खर्च भागविण्याचे एक साधन.

: पक्षकार्य आणि इतर विधायक कार्यासाठी कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण.

: प्रकल्प आणि परिसरातील विस्तारकार्याद्वारे अन्नोत्पादनात वाढ आणि अतिरिक्त उत्पादनाची टनांच्या संख्येत निश्चित केलेली लेव्ही देशाला देणे.

■ देशातील निरनिराळ्या भागांतून हे प्रकल्प चालवण्यासाठी निवडक कार्यकर्ते जमा करावे लागतील. या कार्यकर्त्यांना शाश्वती आणि संधी ( सिक्युरिटी अँड ऑपॉर्च्युनिटीज ) दोन्ही देणारे हे प्रकल्प असावे लागतील. पोराबाळांना घरी खायला असले की क्रांतीसाठी वाऱ्यावर घर करणे सोपे असते ! हे प्रकल्प म्हणजे एक प्रकारे मानवशक्तिसंवर्धन केंद्रच ( मॅन पॉवर ट्रेनिंग सेंटर ) असतील. पक्षाचे नेतृत्व तेथे तयार होईल. अभ्यासकाल ( स्टडी पीरिएड ), प्रत्यक्ष व्यवहार ( अ‍ॅप्लाईड वर्क ) आणि तेथून पक्षकार्य ( पार्टी वर्क ) व तेथून सत्ताकेंद्राचे संचलन, अशी या नेतृत्वाच्या विकासाची दिशा राहील.

■ पक्षाचे तावूनसुलाखून बाहेर पडलेले विधायक प्रवृत्तीचे कार्यकर्ते व मित्र त्यांचे संचलन करण्यासाठी काही काळ तेथे गाडून घेतील. संघ, सेवादलाच्या शाखांतून तयार झालेली मुले, शाळाकॉलेजांतील समाजकार्याकडे कल असलेले तरुण, बेकार युवक, पक्षावर निष्ठा असलेल्या शेतकऱ्यांची उत्तम शेतकरी होऊ इच्छिणारी मुले, निवडक भूमिहीन कामकरी, ' शाश्वती आणि संधी 'ची हमी घेऊन तेथे येतील. ही दुहेरी हमी असली तरच तरुण मन चाकोरीच्या बाहेर सहज उड्डाण ठोकू शकते.

■ या प्रकल्पांना कुठलाही ठराविक छाप असणार नाही. प्रत्येक प्रकल्प परिस्थिती-नुरूप स्वयंसिद्ध ( इंडिजिनस ) असा असू शकेल. कृषीच्या सूर्याभोवती फिरणारी उद्योग-व्यवसायांची ग्रहमालिका हा त्यांच्या रचनेचा पाया एकदा निश्चित झाल्यावर स्थानिक मातीवर स्वाभाविकपणे अनुरूप असा आकार त्याला येईल. कोठे दोनशे एकरांचे संकरबीज क्षेत्र ( हायब्रीड सीड फार्म ) उभे राहील, तर कोठे कोरडवाहू शेतीचे उच्चांक गाठण्याचा प्रयत्न होईल. वीस हजार एकरांच्या मोठ्या फार्मपर्यंत सर्व प्रकार यात बसू शकतील. हीच विभिन्नता संलग्न उद्योग, सरकारी दुग्धसंघटना ( मिल्क युनियन ), ट्रान्स्पोर्ट युनियन, क्रीमरी, राइस मिल, सूत गिरणी, यंत्रभागांचे उत्पादन ( अ‍ॅन्सीलियरी इंडस्ट्रीज ) याही बाबतीत असू शकेल.

■ रशियन अथवा चिनी धर्तीचे साचेबंद मन या प्रयोगांतून तयार होण्याचा

संभव नाही. कारण सगळ्याच पक्षांचे असे कार्यक्रम असतील. पक्षोपपक्षांच्या स्पर्धेला एक विधायक व निकोप वळण देता येईल आणि त्यातून केवळ विध्वंस व विद्वेष या फलिताऐवजी, अन्नस्वावलंबनाचे किमान फलित देशाच्या पदरात पडू शकेल. स्वार्थप्रेरणेने का होईना, पण निर्मिती करणारी मानवी संचलनशक्ती मोकळी होऊ शकेल. भारतीय लोकशाहीने लोकशाहीच्या जागतिक उत्क्रांतीला दिलेली, ही एक अभिनव दिशाही कदाचित ठरू शकेल.

■ प्रकल्पाचा विकास एका टप्प्यापर्यंत येऊन पोचला की त्याचा विस्तार कार्यक्रम सुरू होईल. तेथील प्रशिक्षित युवकांच्या टोळ्या लगतच्याच अनुकूल परिसरात दुग्धव्यवसाय संघटनेसारख्या कार्यक्रमांची शृंखला पुढे नेतील अथवा पक्षासाठी आणखी एखादा प्रकल्प उभारू लागतील. प्रशिक्षण झाल्यावर त्यांच्यासाठी काम वाढून ठेवलेले असेल ते असे :

: या प्रकल्पावर पक्ष-संघटनेच्या ध्येयवादाला अनुरूप असे, बालकमंदिरापासून विद्यापीठापर्यंत विशिष्ट संस्कारी शिक्षण देण्याचाही विचार होईल. ज्यांची उदरनिर्वाहाची फिकीर संपलेली आहे असे तारुण्य, अनुभव आणि प्रतिभा शेतीच्या कक्षेत एकत्र बसतील तेव्हा त्यांच्या धडपडीतून साकार होणाऱ्या या शिक्षणसंस्थांचे रूप 'भाडोत्री' असण्याऐवजी काही वेगळेच राहील. या कृषि-उद्योगांच्या प्रक्रियेत व व्यवहारात प्रत्यक्ष कौशल्य मिळवणारा हा तरुण गुरू मातीचा पुतळा असला तरी एकलव्यासारखा सवाई द्रोणाचार्य निघावा. व्यापक दृष्टिकोणाने विशेषीकृत प्रशिक्षण ( इन्टेन्सिव्ह ट्रेनिंग वुइथ एक्स्टेन्सिव्ह आउटलुक ), व्यावसायिक दृष्टिकोणातून विशेषीकृत अनुभव ( इन्टेन्सिव्ह इक्स्पिरियन्स वुइथ बिझिनेस आउटलुक ) असे या शिक्षणाचे स्वरूप राहावे.

: रशिया, चीनमधील कम्यून्स, इस्रायलमधील किबुत्स, मोशाव, अथवा जुने भारतीय आश्रम व गुरुकुल यापेक्षा हे प्रकल्प देश, काल व परिस्थितीनुरूप वेगळे राहतील. आणि वरील जीवनप्रयोगांतील इष्टानिष्ट निष्पत्तींचा फायदा त्यांना घेता येईल. धोके सुरुवातीपासून टाळता येतील. हे युगच कलम बांधण्याचे आहे ! पुन्हा सुरुवातीपासून प्रत्येक प्रयोग नव्याने करण्याची जरुरी नाही. या प्रयोगांतून निष्पन्न झालेल्या उत्क्रांत तत्त्वांच्या समन्वयाने उन्नत संकर ( हाय-

ब्रीड ) साधण्याचा प्रयत्न त्यात करावा लागेल. उदाहरणार्थ, कम्यून्स आणि किबुत्स वसाहतीत कमीअधिक प्रमाणात आढळून येणारा साचेबंदपणा ( रेजिमेंटेशन ) त्या बसाहतीत नको. जुन्या भारतीय आश्रमातील गुरूचे व्यक्तिकेंद्रित गुरुत्वाकर्षणही, संकुचितपणाच्या व विकृतीच्या सीमेपर्यंत तेथे नसावे. या जुन्या आश्रमातील सहजता, सौंदर्य व स्वातंत्र्य आणि या विदेशी साम्यकुलातील साहस, कर्तृत्व व वैज्ञानिक दृष्टी हे आधुनिक भारतीय साम्यकुलात एकत्र यावे. गतिशील विभिन्नता ( डायनॅमिक डायव्हर्सिटी ) आणि ध्येयोन्मुख शिस्तबद्धता यांचा समन्वय या प्रकल्पात घालता आला पाहिजे. आणि त्यातून 'आम्हाला अभिप्रेत असलेली ती ही पहा समाजव्यवस्था !' असे जिच्याकडे बोट दाखवून म्हणता येईल अशी सगुण उभारणी करणे या विभिन्न पक्ष–संघटनांचे अंतिम ध्येय असले पाहिजे. प्रत्यक्ष वास्तवाच्या मुशीतून या ध्येयांचे रूपही अधिकाधिक स्पष्ट होत जाईल. हे प्रकल्प लोकशाहीची मुळे ( ग्रासरूट्स ऑफ डेमॉक्रसी ) मजबूत करतील. विरोधी पक्षीयांची छाया मंत्री-मंडळे ( शॅडो कॅबिनेट् ) तालुका पातळीवरून उभारणे शक्य होऊ शकेल. पर्यायी संचलन शक्ती ( पॅरलल पर्सोनेल ) या खालच्या पातळीवरूनच तयार करता येईल. शेतकऱ्याला जो कार्यक्रम द्यायचा तो आधीच हातातून गेल्यामुळे कार्यक्रम देणे तर सोपे होईलच, शिवाय नोकरशाहीच्या गुंताळ्यातून त्याच्या अंमल-बजावणीचा नेमका रस्ताही घडवणे सोपे होईल. भान ठेवून योजनांची आखणी आणि बेभान होऊन त्यांची अंमलबजावणी या दोन्हींची सांगड नुसती हवेत राहणार नाही. स्वातंत्र्ययुद्धाच्या काळात सेवाग्राम सारख्या संस्थांतून माणसे प्रक्षेपित केली गेली, तशी समाजाच्या नव्या गरजांशी सुसंवादी असे कर्तृत्व व नेतृत्व देणारी माणसे या प्रकल्पांतून अहमहमिकेने फेकली जातील.

■ मतदारांच्या हातात निर्णयाचे काही मानदंड देता येतील. इतरांची व स्वतःचीही नैतिकता मोजणारे थर्मामीटर अजून अस्तित्वात यायचे आहे. त्यामुळे आचारसंहिता व सदाचार समिती ह्या पाण्यावरील रेघांप्रमाणे प्रभावशून्य व क्षणजीवी ठरत आहेत. काँग्रेसचा सीडफार्म कसा चालतो, जनसंघाची मिल्क युनियन आपल्या शिस्तबद्ध स्वयंसेवकांच्या बळावर कशी बळावते, समाज-

वाद्यांची शीलवान संघटना उद्योगधंद्याचे समाजीकरण कसे यशस्वी करून दाखवते आणि दलितांच्या थरांतून झपाट्याने वर येऊ लागलेले रिपब्लिकन वा नवबौद्ध कार्यकर्ते आपल्या जिद्दीतून कोणते कर्तृत्व प्रस्थापित करतात ते जनतेला दिसेल. कोणता पक्ष आपल्या पूर्व संकल्पाचे इष्टांक पूर्ण करून दाखवतो ते जनता पाहील आणि कौल देईल. श्राद्ध करायचे नसेल तर बाप दाखव, असा रोखठोक प्रश्न तिला उमेदवाराला विचारता येईल.

■ भ्रष्ट कैरो जर पंजाबला उद्यमशील बनवू शकतो, तर ज्यांच्या माणसे व परिस्थिती हाताळण्याच्या कौशल्यावर राष्ट्राचे शिक्कामोर्तब झाले आहे, ते समाजाच्या तळच्या थरातून वर आलेले शुद्ध चरित् आणि व्यक्तित्वसंपन्न राष्ट्रीय नेते, अशी एक फळी का उभारू शकत नाहीत ? बैलांचे प्रतीक धारण करणाऱ्या सत्ताधारी पक्षाने गोवंशसंवर्धनाचे प्रकल्प चालवण्याचा विक्रम किती ठिकाणी केला आहे ? कितीजणांनी कृषिऔद्योगिक सहकारी संस्था न बुडवता चालवल्या आहेत ?
मतदान क्षेत्रातले धान्योत्पादन इतके टन आहे, आमच्या पक्षाच्या कर्तृत्वाने आम्ही ते इतके वाढवणार, ही त्याची योजना, ही त्याची साधनसामग्री, इतकी आमची धान्यवसुली, असे त्याचे वितरण, असा रोखठोक कार्यक्रम या कार्यकर्त्यांना देता आला पाहिजे. अन्नदुर्भिक्ष्यावर उत्पादनवाढ आणि संतति-नियमन असे दुहेरी आक्रमण ( टू प्रॉन्ग्ड अटॅक ) पक्षसंघटनेच्या बळावर त्यांना, मतदारसंघ ही सीमा ठरवून, करता आले पाहिजेत.
आजपर्यंत या सत्तारूढ पक्षाने 'हे घ्या ते घ्या' म्हणून नुसती खैरात करण्याचा खाक्या ठेवला आहे ! जमीन आमची पैसा आमचा, तुम्ही खा. फक्त मतदानाच्या दिवशी जास्तीत जास्त लोकांना धरून आणण्याची सोय करून ठेवा...असे अलिखित आश्वासन आजच्या तथाकथित सेवासहकारी कार्यकर्त्यांच्या पाठीशी असते. कुठल्याही कार्यक्रमाने तो जनतेशी जाहीर रीत्या बांधलेला नसतो. तो काँग्रेसचीही सेवा करीत नाही आणि जमिनीचीही करीत नाही ! मग ऐतखाऊपणा व बेजबाबदारी झाकण्यासाठी सर्व बाह्य सोंगेढोंगे तो कडव्या निष्ठेचा आव आणून चालवतो !

या अकर्मण्यतेनेच पंडितजींसारख्या जागतिक नेत्याला अखेर वैफल्य आले आणि ‘ मेल्यावर माझी राख शेतांत पसरा ’ असे सुंदर, तरीही करुण मृत्युपत्र त्याला करून ठेवावे लागले ! शास्त्रीजींचे ‘ जय जवान ’ झाले, पण ‘ जय किसान ’ करणारे हे दुसऱ्या व तिसऱ्या फळीचे नेतृत्व अशा सच्च्या, जबाबदार प्रकल्पातूनच उभे राहू शकेल.

■ विनोबांच्या आध्यात्मिक नेतृत्वात ही शक्ती आहे. पण ते सूक्ष्मात प्रवेश करण्याऐवजी अधिक भौतिक व्हायला हवे आहे. त्यांच्याजवळ ध्येयनिष्ठ कार्यकर्त्यांचे मोहोळ आहे. पण नुसत्या कागदावर सह्या जमा करून व ग्रामदान ॲक्ट पास होऊन त्यांना अभिप्रेत असलेला भूमिक्रांतीचा वणवा पेटणार नाही. या थोर कार्यकर्त्यांच्या ज्येष्ठ पिढीचे डोळे मिटण्यापूर्वीच, त्यांच्या डोळ्यांदेखत तो विझून गेलेला दिसेल ! पण ठिकठिकाणी उजळलेल्या ठिणग्यांचा वन्ही जिवंत ठेवणारे असे प्रकल्प या हजारो कार्यकर्त्यांनी हाती घेतले तर एका पिढीच्या आत वणवा सर्वत्र पसरलेला दिसेल. असे प्रकल्प ग्रामदानी गावांत संघटित करून, ग्रामदान तुफानात निर्माण झालेली शक्ती सर्जनाच्या कामी लावण्याचे अभियानही त्यांना सुरू करावे लागेल. अन्यथा श्रद्धावान गावकऱ्यांत या एकूण प्रकारांबद्दल काहीशी जागी झालेली श्रद्धा, प्रतिक्रियेने, अंधश्रद्धेचे विघातक रूप घेतल्याशिवाय राहणार नाही. जिल्ह्यातील ग्रामदान आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्या एका प्रमुख सर्वोदयी कार्यकर्त्यांच्या जन्मभूमीत जाण्याचा प्रसंग आला. हे मोठ्यापैकी, जागृत वातावरणाचे गाव ग्रामदानात गेले आणि लगोलग, निधीकडून मिळणारे अनुदान बंद पडल्यामुळे तेथील चरखा संघाची शाखा बंद पडलेली, गांधीजींचे पाय जेथे लागले होते तो आश्रम नेमका ग्रामदानानंतर बंद पडलेला, चरख्यांची सूड अडगळीच्या खोलीत रचून ठेवलेली, आणि निधिजीवी कार्यकर्ते ‘ व्यापक ’ होण्याच्या भूमिकेने सैरभैर पांगलेले दिसले ! हे चित्र अपवादात्मक नसून प्रातिनिधिक ठरेल अशी भीती आहे. ग्रामदानांचे इष्टांक व प्राप्तांक जाहीर करण्याबरोबरच ग्रामदानी खेड्यातील प्रगतीचे आलेख जाहीर होऊ लागतील तेव्हाच या सुतकी वातावरणात बदल होऊ शकेल. आपल्या पूर्वग्रहांच्या झापडी काढून व व्रत-वैकल्यांच्या शृंखला

झुगारून या कार्यकर्त्यांना भूमिक्रांतीच्या आघाडीवर लढावे लागेल. कृषी-शेती-पासून यांत्रिक शेतीपर्यंत, आणि अंबर चरख्यापासून सहकारी सूतगिरणीपर्यंतचे प्रकल्प त्यांना चालवावे लागतील. महायंत्रांचे सर्व फायदे उपटून त्या यंत्रांच्या भव्यतेला व शक्तीला अस्पृश्य लेखण्याची आत्मवंचना सोडून द्यावी लागेल. विनोबांच्या शांति-सैनिकांनाही अखेर शेतावर जावे लागेल. कारण नुसत्या प्रबोधनाने शांती उत्पन्न होत नाही आणि अशांत पोटांत ती नांदू शकत नाही!

■ गाईला देव मानणाऱ्या देशात, गाई खाणाऱ्यांच्या देशातून, माणसांना जिवंत ठेवण्यासाठी अन्न येते, त्याची लाज गमावून आम्ही नसती उपोषणे व आंदोलने करीत आहोत! शेतीच्या परिसरातली गोकुळे निर्माण करण्याची धमक यापैकी किती आंदोलकांनी दाखवली आहे? जुन्या मालगुजारांच्या व जमीनदारांच्या, कूळकायद्याला बगल देऊन पडलेल्या, तण पिकवणाऱ्या, ओसाड जमिनीवर राष्ट्रीय उत्पादनासाठी पक्षाचे प्रकल्प का चालू नयेत? स्वतंत्र पक्षाच्या भाईलाल भाई पटेलांसारख्या 'आनंद'चे गोकुळ व 'विद्यानगर' निर्माण करणाऱ्या नेत्याला व्यक्तीचा स्वतंत्र पराक्रम अशा तऱ्हेने गाजवण्याचा कार्यक्रम पक्षाला का देता येऊ नये?

■ राष्ट्र सेवा दलातील तरुणांना, कोणत्याही समाजवादी पक्षांचे 'सेकंड फिडल' वाजवण्याची गतानुगतिकता पत्करण्याऐवजी, हे निखळ समाजवादी प्रकल्प चालवता येतील, आणि खरे 'सोशलिस्ट फौंडेशन' उभारता येईल. सेवा दलाचे शिक्षण घेताना जसे सेवा दलच, तसे प्रकल्प उभारताना प्रकल्पच. त्यानंतर हवी तर पक्षाला त्यांनी वर्षे द्यावीत. पूर्ण वेळ देऊ न शकणाऱ्यांनी उन्हाळ्याच्या, नाताळच्या सुट्ट्या अथवा फावल्या वेळातली शक्ती तेथे नियोजितपणे केंद्रित करावी. उद्या समाजवाद्यांच्या हातात सत्ता आली तरी राष्ट्रीयीकरणानंतर कारखाने कोण चालवणार? समाजवादाशी जिचे काही सोयरसुतक नाही अशी गॅझेटेड नोकरशहांची यंत्रणाच की नाही? टाटांच्या दिवाणजींकडून चालवल्या जाणाऱ्या त्या झोपलेल्या कारखान्यात, हा प्रशिक्षित समाजवादी अथवा साम्यवादी तरुण जाईल, तेव्हा त्यालाही समाजक्रांतीच्या जिवंत माध्यमाचे रूप

तो देऊ शकेल. राष्ट्रीय एकात्मता आणि सर्व लोकशाही राजकीय विचारांचा प्रागतिक समन्वय असे ध्येय डोळयांपुढे ठेवून काही पक्षातीत प्रकल्पही चालवता येतील. सोमनाथ येथील संकल्पित 'मानव शक्ति संवर्धन केंद्र' (मॅन पॉवर ट्रेनिंग प्रोजेक्ट) हा याच संदर्भात होणारा प्रयत्न आहे. सर्व पक्ष संघटनाच्या कार्यकर्त्यांना व नेत्यांना सोमनाथाचे आव्हान आहे. म्हणून तेथे काँग्रेसच्या अब्दुल शफीचेही स्वागत आणि साधनाकार यदुनाथ थत्त्यांचेही. कलेक्टर राऊत यांना त्यात जेवढा रस तेवढा डॉ. सदाफळ या संघनिष्ठ कृषितज्ञासही. कम्युनिस्ट कार्यकर्त्यांना त्याबद्दल उत्कंठा आणि सर्वोदयी अण्णासाहेब सहस्र-बुद्धयांचीही त्यासाठी केवढी धडपड !

■ भाषा व प्रांतभेदांवर पक्षांची अखिल भारतीयता मात करू शकत नाही, असा अनुभव आहे ! एका दिवशी अधिवेशनात एकत्र येऊन, भावनात्मक ऐक्य साधले जाऊ शकत नाही. पण उत्तर–दक्षिणेतले तरुण आपल्या पक्षाच्या अथवा अशा एखाद्या पक्षातीत प्रकल्पात एकत्र येऊन या भेदांचे फोल व कालबाह्य स्वरूप अनुभवाने पाहू शकतील. भुकेचा प्रश्न सोडवण्याचेही कसब हेच अंतिमतः वंश, भाषावादांचा प्रश्न सोडवण्याचेही कसब आहे ! भुकेची भाषा हीच खरी आंतर भारती आहे !

■ संघाच्या बौद्धिकातले राष्ट्रैक्यही फक्त शाखास्थानांवर, झेंड्याखाली नांदत असते ! पण तोच धनिक शेतकरी तांदूळ साठवून आपल्या गरीब हिंदू बांधवाला भरमसाट भावाने विकताना मागे पुढे पाहात नाही ! त्याचा ध्येयवाद तेथे लटका पडतो, आणि हा त्याचा दोष नसून परिस्थितीच्या ज्या कोंडाळ्यात तो साप-डलेला आहे त्याचा दोष असतो.
संघाचे एक शिबिर सोमनाथाचे जंगल तोडून देण्यासाठी का भरू नये ? बुद्धाच्या जिद्दीनेच पण निर्वाणाऐवजी निर्माणाची साधना करणारे बुद्धिमान तरुण सैनिकांच्या शिस्तीने, विशिष्ट साहसासाठी एकत्र येतील तर एकमेकांच्या रागलोभांवर व मतभेदांवर मात करणारे वातावरण त्यांना तयार करता येईल, (हा बुद्धिमान समाजवादी तरुण आज मन नसुन बँकेत नोकरी करतो ! काँग्रेस-

निष्ठ ध्येयवादी, खोटया पगारावर मुकाटयाने सह्या करतो ! आणि संघाचा तरुण मुख्याध्यापक 'युगांतर' पाहणाऱ्या शाळेची खोटी बिले तयार करतो !) प्रकल्पात काम करताना प्रकल्प हीच प्राथमिक निष्ठा, अशी मनाची तयारी करून त्यांना यावे लागेल आणि व्यक्तिगत व पक्षीय महत्त्वाकांक्षा काही काळासाठी काबूत ठेवाव्या लागतील. या प्रकल्पातून अनुभव आणि सामर्थ्य यांचे जे द्रव्य उपलब्ध होईल, त्यावर आपल्या विचारसरणीचे कलम मग पक्षसंघटनांनी बांधावे. नुसती लेबले लावू नयेत ! मार्क्सचे पुस्तक, अमेरिकेत बसून जयप्रकाशही वाचतो, तसा हा प्रकल्पही वाचता यावा ! येथे तयार झालेले कार्यकर्ते आपल्या संघटनेसाठी अशाच तऱ्हेचे अथवा त्याच्या खांद्यावर उभे राहून अधिक व्यापक क्षितिज पाहणारे प्रकल्प चालवू शकतील.

■ अमेरिकन भांडवलदारांना सरकार उद्योग उभारू देते. रशियन उभारणीचे कारखाने व सीड–फार्म भारतात चालू शकतात, इंडो–अमेरिकन एज्युकेशन फौंडेशन काढताना भीती वाटत नाही, त्याच निर्भयतेने इतरही पक्षांना ही संधी उपलब्ध करून देण्यात सत्तारूढ पक्षाला कसेसे वाटू नये ! ही पक्षांची उत्पादक चढाओढ भारतीय निवडणुकांसारखी न्यायी यंत्रणे द्वारे व निकोप वातावरणात कशी सुरू करता येईल ?

ही यंत्रणा उभारण्याची दिशा, पुढीलप्रमाणे सूत्रबद्ध करता येईल–

१– एक प्राथमिक स्वरूपाची पण मध्यवर्ती संयोजन व संपर्क समिती (लायसॉनिंग एजन्सी).

२– सर्व राजमान्य पक्षांच्या सर्वोच्च राष्ट्रीय नेत्यांची परिषद आणि सर्वपक्षीय प्रकल्प अभियानांच्या (ऑल पार्टी ॲक्शन प्रोग्रॅम) कल्पनेला मान्यता.

३– तिच्यावर संसदेचे शिक्कामोर्तब.

४– दरम्यानच्या काळात, आनुपातिक प्रतिनिधित्वाच्या (प्रपोर्शनल रिप्रेझेंटेशन) आधारावर राष्ट्रीय छाया मंत्रिमंडळांची (नॅशनल शॅडो कॅबिनेट) निर्मिती. या मंत्रिमंडळाच्या बहुमताने अ-राजकीय संस्थाच्या प्रतिनिधींची निवड, संविधान तयार करणे. त्यानंतर पक्षशाखांना प्रकल्प योजना तयार करण्यासंबंधी आदेश.

५– एका विशेषज्ञ (टेक्नोक्रॅट्स) मंडळाची निर्मिती, आणि ६७ च्या निवडणुकी-

तील उपलब्ध राजकीय चित्राच्या आधारे सर्व राजमान्य पक्ष व अपक्ष संघटनांसाठी प्रकल्प उभारणीच्या योग्य क्षेत्राची पाहणी व अंतिम निवड.

६– प्रकल्पांसाठी लागणाऱ्या साधनसामग्रीचे संपादन, संयोजन संचालन व नियंत्रण.

७– प्रकल्पाच्या फलितांचे नियतकालिक मूल्यमापन ( इव्हॅल्यूएशन ) व राष्ट्रीय निर्मिती संविधानात ठरतील त्याप्रमाणे आवश्यक उपाय योजना.

८– अपक्ष लोकशाहीच्या पुरस्कर्त्यांद्वारे तालुका पातळीपासून या सर्वपक्षीय छाया मंत्रिमंडळाच्या कामकाजाला पूरक व प्रेरक ठरतील अशा ‘ मतदार मंडळाची ’ निर्मिती.

दा. क्र. १६२०९



REFBK-0016295
REFBK-0016295

वाचनालय
क्रमांक ७८८० विः काव्य
२००९ (२५।३।२००९)